
# माणूस

शनिवार । २५ फेब्रुवारी १९७८

सव्वा रुपया

# साप्ताहिक माणूस

वर्ष सतरावे–अंक एकूणचाळीस

२५ फेब्रुवारी १९७८

मूल्य सव्वा रुपया

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ : श्याम जोशी

छायाचित्रे : श्री. गोडांबे, प्रकाश जाधव

छायाचित्र मांडणी : बाबू उडुपी


# अटलजींची सभा

दक्षिणकाशी पुणे !

त्यागाचे आणि निष्ठेचे राजकारण करणाऱ्या भारतीयांना पुण्याविषयी काय वाटते ते या दोन शब्दांत व्यक्त करून अटलबिहारी वाजपेयींनी पुणेकरांची मने जिंकून घेतली.

स. प. मैदानावरची विराट सभा. शनिवार दि. १८–२–७८.

मोठ्या सभा हे निदान पुण्याला तरी आता नाविन्य उरलेले नाही. चरणसिंगाची, सुब्रह्मण्यम्स्वामीची सभाही मोठीच होती; पण भारावलेली सभा ही अटलजींची. सभा गर्दीहून वर उचलण्याचे, एका वेगळ्याच वातावरणात तरंगत ठेवण्याचे विलक्षण सामर्थ्य अटलजींच्या वक्तृत्वात आहे. या वक्तृत्वगंगेचा परिणाम केवळ मतांवर होत नाही. मनेही सुस्नात होतात. सभा निवडणुकीची होती. त्यामुळे निवडणुकीतल्या अपेक्षित यशावर शिक्कामोर्तब करणे हा सभेचा हेतू होताच. तो साध्यही झाला; पण त्यापेक्षाही अधिक काही तरी ही सभा पुणेकरांना देऊन गेली. ध्येयवादाचे आकर्षण हा पुणेकरांचा स्थायीभाव. जनता पक्षाचा ध्येयवाद या सभेत मांडला गेला आणि तोही अशा तळमळीने आणि उदात्त पातळीवरून, की जमलेले लक्षावधी श्रोते भारावून गेले; या ध्येयवादासाठी पडेल तो त्याग आणि कष्ट करण्याची प्रेरणा असंख्यांना देणारे हे एक ओजस्वी आत्मकथनच होते.

तीस वर्षांत काँग्रेसने काहीच केले नाही, हा सूर अटलजींनी न लावल्यामुळे सभा लगेचच वर उचलली गेली.

काँग्रेसलाही देशाची गरिबी घालवायची होती, पण मार्ग चुकला एवढीच टीका त्यांनी केली.

गरिबी घालवायची म्हणजे प्रत्येकाला काम मिळवून द्यायचे. हे काम खेड्यात मिळवून दिले पाहिजे. हे गेल्या तीस वर्षांत झाले नाही. म्हणून शहरे अफाट वाढली, माणसे फुटपाथवर–झोपडपट्ट्यात गर्दी करून राहू लागली. शेती–शेतकरी परागंदा झाला.

हा सगळा प्रवाह आता उलटवायचा म्हणजे थोडा वेळ लागणारच. पाच वर्षांत आम्ही हे करून दाखवू. न केल्यास आम्हाला हाकलून द्या किंवा आम्हीच आपणहून दूर होऊ !

न भीतो मरणादस्मि, केवलं दूषितं यशः ।।

मरणाला, सत्तात्यागाला आम्ही भीत नाही. होती कुठे इतकी वर्षे सत्ता ? तरीही सगळं सोडून कार्य करीतच राहिलो. आता संधी मिळाली आहे तर जे केवळ सांगत होतो, बोलत होतो ते आता प्रत्यक्षात, व्यवहारात उतरवूनही दाखवू म्हणतो. अभिवचने उगाच दिलेली नाहीत. ती पूर्ण करायीत हा अट्टाहास आहे. त्यासाठी संधी हवी आहे पाच वर्षांसाठी. नीट संधी वापरली गेली हे दिसून आले तर आणखी पाच वर्षांची मुदत वाढवून द्या !

अभिवचने दोन.लोकशाहीची पुनःस्थापना आणि प्रत्येकाला काम !

पहिले अभिवचन तर पूर्ण झाले. आज सगळे मुक्त आहेत. २५ जून १९७५ सारखा दिवस पुन्हा या देशात कधीही उगवणार नाही, अशी ग्वाहीच अटलजींनी सभेत दिली.

दुसरे अभिवचन. त्यासाठी उद्योगधंदे खेड्यापाड्यात नव्याने सुरू करायला हवेत, आहेत ते विखुरलेही जायला हवेत. शेतीला प्राधान्य मिळायला हवे.

तरुणानी,नव्या पिढीने यासाठी पुन्हा खादीकडे-चरख्याकडे वळले पाहिजे असा अटलजींचा आग्रह नाही; पण टेरिलिन कापडसुद्धा खेड्यापाड्यात विखुरल्या गेलेल्या लहान उद्योगातून निर्माण होऊ शकते, तसे तंत्र आपण विकसित करायला हवे, ते अशा य नाही हा त्यांचा दावा. सगळा वस्त्रोद्योग खेड्यात जाऊ शकतो असेच जणू त्यांना सुचवायचे होते. साबण, काडेपेट्या, सायकली, पादत्राणे...ही यादी आणखीही खूप वाढू शकते.

वृत्तपत्रातून आपण वाचतो, थंडीची लाट आली. बिहारमध्ये, उत्तर प्रदेश; दिल्लीमध्ये शेकडो माणसे या हिमलाटेमुळे मरण पावली. अटलजींनी सांगितले, हे खरे नाही थंडीची लाट आलेली असतेही; पण त्यामुळे माणसे मरत नाहीत. माणसे मरतात अंगावर कपडे



सभा संपल्यावर
मा. अटलजी, डॉ. अरविंद लेले आणि मा. मोहन धारिया

नसल्यामुळे. आणि त्याच वेळी दुकाने-बाजारपेठा कपड्यालत्त्यांनी गच्च भरलेल्याही असतात. खेडेगावात उद्योग नाही, जमीन नाही म्हणून तरुण मुले-माणसे शहरात येतात. काबाडकष्ट करतात. छाती फुटेपर्यंत रिक्षा हाकतात. दोनचार रुपये सुटतात ते खाण्यापिण्यात उडून जातात. कपडे घ्यायला पैसा नाही. डोक्यावर छप्पर नाही. पोटात निकृष्ट अन्न–पीकपाणी उत्तम असून धान्यसाठा ठेवायला जागा नाही अशी स्थिती असतानाही. अशीच अर्धपोटी, अर्धनग्न माणसे थंडीच्या लाटेला बळी पडतात ! एकीकडे समृद्धी, दुसरीकडे हे उघडेनागडे दारिद्रच ! या दोन टोकातले अंतर कमी कसे करायचे हा खरा यक्षप्रश्न...

प्रश्न तर अटलजींनी अचूक मांडला. उत्पादन वाढले पाहिजे ही हाकाटी नेहमी केली जाते. यंत्रामुळे उत्पादन वाढतच असते. त्यासाठी नियोजनाची फारशी आवश्यकता असते असे नाही. सवाल आहे या उत्पादित मालाला गिऱ्हाईक कुठून आणायचे ? यावर उपाय एक–जो लॉर्ड किन्स या अर्थशास्त्रज्ञाने सुचविला. सार्वजनिक उपयोगाची कामे सरकारने मोठ्या प्रमाणावर काढली पाहिजेत. रस्ते, घरे, दवाखाने, धरणे, कालवे इत्यादी. यामुळे रोजगार उपलब्ध होतो; पण गिऱ्हाइकांच्या शोधात असलेला नवीन माल बाजारात येत नाही. रोजगार उपलब्ध झाल्याने पैसा खेळतो व आहे तो बाजारपेठातला माल हलू लागतो. टोकाला जाऊन किन्सने असेही सांगितले, की अशी कामे शिल्लकच नसतील तर चक्क जमिनीत खड्डे खणण्याचे व ते परत बुजवण्याचे काम लोकांना द्या; पण रोजगार उपलब्ध करा.लोकांना रिकामे राहू देऊ नका. आपल्याकडे अशी वेळ येण्याचे नजिकच्या भविष्यकाळात तरी कारण नांही. सहा लाख खेडी आहेत.या खेड्यातील झोपड्यांचे नूतनीकरण हा किमान दहा वर्षे पुरू शकेल असा कार्यक्रम आहे. शहरातल्या झोपडपट्ट्या तर अक्राळ-विक्राळ स्वरूपात उभ्या आहेतच. नुसते कालवे खणण्याचे काम दोन पिढ्यांना पुरून उरेल ! कीन्स हा भांडवलशाही पद्धतीला रुचेल–मानवेल अशी उपाययोजना सांगतो. समाजवादी धर्तीची अर्थव्यवस्था असेल तेथे सर्वच संपत्ती शासनाच्या मालकीची असल्याने ही उपाययोजना अंमलात आणणे अधिक सुलभ जाते, इतकेच. जनता पक्षाने गांधीवादी पद्धतीचा समाजवाद हा आपला आदर्श ठरविला आहे. प्रश्न आहे हा व्यवहारात उतरणार केव्हा आणि कसा ? अटलजींसारख्यांच्या भाषणातून काही दिलासा जरूर मिळतो; पण प्रचिती मात्र आलेली नाही. अटलजी पाच वर्षांची मुदत मागतात. मोरारजी दहा वर्षे म्हणतात. प्रश्न पाच किंवा दहा वर्षांचा नाही. प्रश्न प्रस्थापित हितसंबंधांना डावलून, त्यांचा अपरिहार्य असणारा विरोध मोडून काढून, अर्थव्यवस्थेला हे क्रांतिकारक वळण निर्धारपूर्वक देण्याचा आहे आणि हे वळण ही राजवट नवीन आहे, गुंतागुंती कमी आहेत, जडता वाढलेली नाही तेव्हाच देता येईल. पोलाद गरम असताना हवे तसे वळवता येते. ते थंड झाले की वळण देईन म्हणणाऱ्यालाही गारच व्हावे लागते. असे क्रांतिकारक वळण देण्याचे प्रयत्न झाले आहेत का, हा खरा सवाल आहे. उदाहरणार्थ, अल्प उत्पन्नगटासाठी प्रचंड प्रमाणावर घरबांधणीचा कार्यक्रम तडकाफडकी का हाती घेतला जात नाही ? ज्या राज्यात सत्ता जनतापक्षाकडे आली त्या राज्यात तरी, ग्रामीण पुनर्रचनेला वेग का आणला जात नाही ? या राज्यात, प्रत्येक जिल्ह्यातील निवडक पन्नास-शंभर खेडी तरी रस्ते, पाणी, संडास, घरे, दवाखाने याबाबतीत नमुनेदार करून दाखविणे अशक्य नाही. तेवढा पैसा आणि स्थानिक साधनसामग्री आजही उपलब्ध आहे. केवढा तरी रोजगार यातून उत्पन्न होईल, चलन खेडेगावात फिरू लागल्याने शहरांकडे येणारा लोंढा तेवढ्या प्रमाणात आवरला जाईल. एकदा शहरात आलेली माणसे गावाकडे पुन्हा परतत नाहीत असा सर्व ठिकाणचा अनुभव आहे. त्यांची काही तरी सोय यापुढे शहरातच पाहावी लागणार आहे; पण नवीन येणाऱ्यांचा वेग ताबडतोब कमी करणे तरी शक्य आहे. त्यासाठी असे ग्रामीण पुनर्रचनेचे धडक कार्यक्रम हाती घेतले जायला हवे होते. त्यासाठी नऊ महिन्यांची मुदत काही कमी नाही. अशी कल्पकता, उपक्रमशीलता कुठे दाखवली गेल्याची माहिती नाही. असल्यास या उपक्रमांची, कार्यक्रमांची माहिती सभासभांतून करून दिली जायला हवी. कर्पूरी ठाकुरांची सभा या दृष्टीने थोडीफार उपयुक्त ठरली हे मान्य करूनही यापुढे या आघाडीवर फार त्वरेने काही उठावदार हालचाली व्हायला हव्यात हे निर्विवादच आहे. समोर दुसरा राजकीय आर्थिक पर्यायही नाही हे खरे

आहे. पण पोकळी निसर्गालाच मंजूर नाही हे त्याहूनही अधिक खरे नसते काय ?

□

परराष्ट्र व्यवहारक्षेत्रातले 'जनता' चे गेल्या आठ-दहा महिन्यातले यश मात्र वादातीत आहे, उठावदार आणि जनमानसाची पकड घेणारेही आहे. कालपरवा मुक्त झालेल्या व्हिएतनाम देशाचा प्रतिनिधी जर यूनोमध्ये त्याच्या मातृभाषेतच भाषण करण्याचा आग्रह धरू शकतो तर साठ कोटी लोकसंख्येच्या,तीस वर्षांपूर्वी स्वतंत्र झालेल्या देशाने इंग्रजांची गुलामी का मिरवावी ? हे गुलामीचे चिन्ह अटलजींनी भिरकावून दिले आणि यूनोसभेत हिंदीत भाषण करून जगाला आपण कुठल्या गोत्राचे राष्ट्रवादी आहोत याचा प्रत्यय आणून दिला. तशी ही कृती वरपांगी व मानसिक समाधान देणारी; तरीपण असल्या बारीकसारीक कृतीतूनही आपली ओळख जगाला पटत जाते, आपली राष्ट्रीय प्रतिमा साकार होत राहते. ही प्रतिमा नेहरू–मेनन काळात अर्धवासाहतिक होती. पूर्ण स्वतंत्रतेचे तेज या प्रतिमेवर विलसत नव्हते. आपण गरीब होतो व अजूनही आहोत; पण याचा अर्थ आपल्याला स्वतंत्र अस्तित्व व आविष्कार वैशिष्टच असू नये असा नाही. हे अस्तित्व आणि वैशिष्टय जपण्याचा जनताशासनाचा निर्धार आजवर पुरेसा स्पष्ट झालेला आहे. इंदिरा गांधी काहीही म्हणोत. अटलजींचे एक वाक्य त्यांची सर्व टीका बोथट करू शकेल असे आहे. 'हा देश विकत घेईल असा कुबेर कुणी जगात आहे का ?' कार्टर असो, ब्रझनेव्ह असो... भारताची अलिप्तता, स्वतंत्र अस्मिता यांना ते ढळ पोचवू शकत नाहीत हे सिद्ध होऊन चुकलेले आहे. मदत चालू राहिली तरी अशा मदतीची यापुढे उभयतांनाही गरज आहे, ही वस्तुस्थिती जसजशी ध्यानात घेतली जाईल, तसतसे दबावदडपणाचे प्रयत्नही कमी कमा होत राहतील, हे उघड आहे.

शेजारील लहानसहान देशांशी मैत्री हा तर अटलजींचा – जनता शासनाचा – खास उपक्रम. त्यांचे पूर्वाश्रमीचे जनसंघियत्व याआड मुळीच आले नाही, यातच जनसंघाविषयी किती पूर्वग्रह हेतुपुरस्सर किंवा अहेतुकपणे पसरविले गेलेले होते याचा पुरावा येऊन जातो. मैत्री आणि परस्पर सहकार्याचे नवे वारे या सर्व भारतीय उपखंडात वाहू लागलेले आहेत. इराणपासून दक्षिण व्हिएतनामपर्यंत ही एक गरीब देशांची मालिकाच पसरलेली आहे. एकमेकांविरुद्ध लढाया करून परक्या साम्राज्यसत्तांच्या हस्तक्षेपाला येथे भरपूर वाव उपलब्ध करून दिला जात होता. परिणामतः येथील गरिबी वज्रलेप होत होती हे हस्तक्षेप, ही तोडमोड, या फाळण्या यापुढे थांबतील व विकासाची यात्रा या गरीब देशांना लवकर पूर्ण करता येईल– जर हे शांततेचे, सहकार्याचे वारे आणखी काही काळ असेच पुढे वाहात राहिले तर. पाकिस्तानशी तर आपले जुने हाडवैर; पण योगायोग असा की, हे हाडवैर एके काळी जरणारे अटलजीच नव्या सहकारयुगाचे शिल्पकारही ठरू पाहात आहेत. मेहदी हसनचा त्यांनी केलेला उल्लेख मार्मिक होता. या कलेच्या, संस्कृतीच्या पातळीवरच हे दोन कृत्रिमपणे अलग झालेले देश प्रथम एकत्र येऊ शकतील. नंतर व्यापारी आणि अगदी शेवटी राजकीय पातळी आहेच. चिरफाळलेला झालेला युरोपखंड जर समान आर्थिक हितसंबंधासाठी एकत्र येऊ शकतो, तर भारतीय उपखंडातही अशी समान भूमिका–निदान आर्थिक क्षेत्रात तरी–का निर्माण होऊ शकणार नाही ? इराणचा शहा या कल्पना सृष्टीत वावरतो आहे, हे अटलजींनी जाताजाता सूचित केले. जाणकरांचे असे मत आहे, की शहांच्या या कल्पनेला आजवर भारताकडून उत्तम प्रतिसाद लाभत आलेला आहे. भारतीय तंत्रज्ञांना तर आज सारी मध्यपूर्व मोकळी आहे ...

□



सौ. शांती नाईक, श्री. विठ्ठल तुपे, डॉ. अरविंद लेले, खा. मोहन धारिया श्री. अटलजी, श्री. सुभाष सर्वगोड, श्री. भाई वैद्य.

क्षितिजे विस्तारत आहेत, जुने ऋणानुबंध जागे होत आहेत. दुरावलेले प्रवाह एकमेकात मिसळत आहेत. हे मोकळे वारे असेच काही काळ वाहू दिले गेले पाहिजेत. जुनी जाळीजळमटे, कोळिष्टके यातून हा देश, हा समाज, हे पक्षोपपक्ष मुक्त होतील. परिसर स्वच्छ दिसेल, वातावरणात निर्मळता येईल. निवडणुका असोत, नसोत. अशा वातावरण शुद्ध आणि निर्मळ करणाऱ्या सभा वरचेवर व्हायला हव्यात. त्यामुळे विस्कळित झालेली मते आणि मने जोडली जातात. उत्साहाचा संचार होतो. समदायभावाचे जागरण होते.

अशा सत्ता हा एक अनुभव असतो. सामुदायिक मनाने घेतलेला. दीर्घकाळ स्मरणात राहणारा !

सुप्त राष्ट्रीय आकांक्षाना अशा सभांमुळे जाग येत असते.

शेवटी अशी काही राष्ट्रीय आकांक्षा जागृत होण्या न होण्यावरच आपले भवितव्य, पुढची वाटचाल अवलंबून आहे, हे उघडच आहे.

अटलजींसारखे नेते अशा राष्ट्रीय आकांक्षांना फुलवीत–चेतवीत–जागवीत असतात. त्या दिवशी फुलली–जागली नसेल अशी सभेत एकही व्यक्ती नसावी !

किंबहुना व्यक्तींचे सुटेसुटे अस्तित्वच एका विशाल जनसमुदायात त्या संध्याकाळी विलीन झालेले होते.

–श्री. ग. मा.

### अकलूज वार्तापत्र :

# मोहितेशाहीला महागात पडणारा चंद्रशेखरांवरचा हल्ला

**'माणूस' प्रतिनिधी**

हुकूमशहाला सदैव आपल्याला कुणी विरोध करील की काय, अशी भीती वाटत असते व त्या भीतीपोटीच कुठे काही खुट्ट झाले की, तो सैरभैर होतो. कारण त्याला आपलेच अस्तित्व कायम ठेवावयाचे असते. त्या अस्तित्वासाठी तो सगळ्या शक्ती एकवटून प्रतिकार करीत राहातो. शेवटी प्रतिकार करता सारा विवेक संपल्याने त्या हुकुमशाहीचा अंत होतो आणि मग उरतात फक्त आठवणी – या इथे एके काळी अमुक अमुक नावाचा हुकुमशहा होता आणि त्याच्या नंगा नाचाला चोख उत्तर दिले ते जनतेने, अशा मार्गाने, अशीच तंतोतंत परिस्थिती महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यात असलेल्या माळशिरस तालुक्यातील अकलूज गावच्या सु(कु)प्रसिद्ध शकरराव मोहिते पाटलाची होत आहे. ती होणार आहे.

श्री. शकरराव मोहिते पाटील म्हणजे बडे प्रस्थ. पार १९५२ पासून आजच्या निवडणुकीपर्यंत मोहिते पाटील यानी आपण सांगू ती पूर्व दिशा, अशा वातावरणात काढलेली. तीन साखर कारखान्यांवर वर्चस्व. तालुक्यातल्या अनेक संस्था ताब्यात ठेवल्या. होयबाची प्रचंड फौज गोळा केली आणि आपली झुंडगिरी गेले २५–३० वर्षे चालू ठेवली. केवळ नजरेच्या इशाऱ्यावर अनेकांची कंबरडे मोडली, हात वर करताच एखाद्याचा संसार धुळीला जातो तो इथच. आपल्याच छत्राखाली आम रयतेने वागावे अशी जबरदस्त महत्त्वाकांक्षा असलेला हा मोहिते घराण्याचा वारस आपले साखरी साम्राज्य डगमगू नये म्हणून आज काय वाटेल ते करावयास तयार आहे. काहीही करीत आहे, करण्याची जाहीर भाषा करीत आहे. तेव्हा शोषित–पीडित विकलांग झालेली जनता म्हणते आहे की 'अरे, द्रौपदीची लाज राखणारा कोणीच श्रीकृष्ण येथे नाही का? अक्षरशः शेकडो अपराध झाले तरी शिशुपाल उन्मत्त कसा? कुणीच या धरतीवर अशा उन्मत्त सांडाला लगाम घालणारा राहिला नाही काय? दुबळ्याच्या काठीला कधी आवाजच येथे आला नाही. काठीचे घुंगरू कधी वाजलेच नव्हते. शेवटी सगळेच दुबळे एकत्र झाले आणि त्यांनी ठरविले की, आमच्या इथले हे साखरी साम्राज्य मोडावयाचे, तोडायचे, फोडायचे आणि माळशिरसच्या दशदिशांतून एकच आवाज घुमला, 'जनता पार्टी झिंदाबाद.'

या झिंदाबादनेच शंकरराव मोहिते पाटील हादरले. देवकीचा आठवा तुझा वध करील, अशी झालेली आकाशवाणी ऐकून कंसाने देवकीची सर्व संताने मारली; परंतु 'आठवा' त्याला गवसलाच नव्हता. म्हणून तर कंसाचा वध झाला. तसंच शंकरराव आणि त्यांच्या चेल्यांनी ठरविले, 'जनता पार्टी झिंदाबाद काय! बघतो एकेकाकडे' आणि कोणत्या गावात 'जनते'चा कार्यकर्ता दिसला की, एकटा-दुकटा पाहून दे चोप त्याला. कुठे बारकीशी मीटिंग झाली, घाल ट्रॅक्टर तिच्यावर. कुठे जनतेची सभा लागली की, फेका दगड आन करा चार–घा जखमी. अशा उद्योगानं झालं काय, जनतेची हवा दबण्याऐवजी ती वावटळीसारखी गरगराच फिरली अन् आता जनतारूपी श्रीकृष्ण याच परिसरात दिसामासानी वाढला. इतके हे बाळ गुटगुटीत झाले की, मोहिते पाटलांचे चाणूर–मुष्टीक यांच्यासारखे मल्ल मागेच भुईसपाट झाल्याने खरा हादरा ह्या साखरी सम्राटाला बसला आहे आणि आता शकरराव मोहिते पाटील साऱ्या जारण–मारण–करणी, भूत–पिशाच्च–सैतानांचे सेवेसह ह्या श्रीकृष्ण चिरडण्यासाठी पिसाळले आहेत आणि जाहीर वल्गना करीत आहेत, 'कुठं आहे जनता? कुठंय तो पन्नालाल? कुठंय तो चंद्रशेखर! 'काहीबी करा; पण जनतेला गाडा' आणि या गाडागाडीतच दि. १३ फेब्रुवारीला दुपारी अखिल भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष खासदार चंद्रशेखर यांचे डोके फोडण्यात आले. पाच-पंचवीस जनतावाल्यांना पिटले गेले आणि परत एकदा आपल्या बळाचे (!) प्रदर्शन मोहिते पाटलानी केले; पण विवेकशून्य माणसाला त्याची बुद्धी सोडून जाते, तद्वत हे प्रकरण झाले. मोहिते पाटलांच्या हस्तकांचा चंद्रशेखरवरचा हल्ला हा आख्ख्या हिंदुस्थानात गेल्या वर्षापासून चाललेल्या ठोकशाही विरुद्ध लोकशाहीच्या लढ्यावरच हल्ला झाला आणि हाच हल्ला शंकररावाना चारी मुंड्या चीत करणार आहे.

मोहिते पाटील असे का वागतात? आम्ही नातेपुते, माळशिरस, अकलूज, माढे तो पार बार्शीपर्यंत अनेकांना भेटलो. अनेकांनी आपली मते दिली. उजनी धरणाच्या कॉलनीकडे जाणारी कमान आहे, तिथे असलेल्या चव्हाट्यावर बसलेल्या एका शेतकऱ्याने सांगितले तेच खरं वाटतं. 'उन्मत्त बैल डिरक्या टाकत जातो. त्याच्या माहीत नस-

लेल्या शक्तीला भिऊन सारेच पडतात; परंतु इराला पीर भेटला म्हजी उन्मत्त बैल पार मुडी टाकतो, तसं मोहिते पाटलाचं झालंय. अवो, आपल्यापेक्षा कुणीच मोठा होऊ नये म्हणून सारा आटापीटा. दुसऱ्याला काहीच द्यायचं नाही ही प्रवृत्ती. म्हणून तर थोरला (विजयसिंग) झेड. पी.त अध्यक्ष केला; दुसरा (रायसिंग) खरेदी-विक्री संघाचा अध्यक्ष. तिसरा (जयसिंग) शेतीसघटनेवर ! तर चौथा अकलुजचा सरपंच केलाय. दोन पोर लवकरच (सत्ता राहिली तर !) कुठं तरी बसवील. अगदी नेहरू घराण्यागत बघा ! तिकडे इंदिरा होती आन संजय तर इथं सहकार-महर्षी आमदार शंकरराव मोहिते पाटील आन त्यांचा गोतावळा बघा !

यावर यापेक्षा उत्कृष्ट भाष्य असू शकेल काय ?

श्री. शकरराव मोहिते-पाटील १९५२ ते ६० पर्यंत शेकापचे नेते होते. नंतर कॉंग्रेसमध्ये गेले. फक्त ७२ ते ७८ सोडले तर ते आजतागायत आमदार आहेत. ७२ सालात आपल्याच भावाला आमदार केले. त्यांचं नाव चांगोजीराव देशमुख. (ते दत्तक गेले की हे दत्तक आले समजायला मार्ग नाही.) यशवत, सदाशिव व माळी-नगर हे तीन सहकारी साखर कारखाने ताब्यात. स्वतःचे नावावर फक्त पाच एकर शेती; परंतु साऱ्या कुटुबाची मिळून २५० एकरां-पर्यंत जावी. अनेक संस्था ताब्यात. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष अनेक कारखाने व सस्था ताब्यात असल्याने शेतकऱ्यांच्या नाडया त्यांच्या हातात. त्यातून लाचारांची फौज उभी राहिली. त्यातही कुणी विरोधाला उभे राहिलेच तर त्याचा काटा काढण्याचे अनेक मार्ग हाताळण्यात पटाईत. एक मुलगी कोल्हापूरचे महाराजाचे सचिवाचे मुलास, दुसरी श्रीमंत दौलतराव तथा बाळासाहेब देसाई यांचे मुलास तर तिसरी (बहुधा) एक मंत्री शिवाजीराव निलगेकर देशमुख याचे मुलास देण्याचे घाटत आहे. एखाद्या सस्थानात राजा-राणी, युवराज, युवराज्ञी यांचीच नावे दवाखाने, क्रीडांगणे, शाळा-कॉलेजेस् आदीना दिली जातात; तशीच नावे पाझर-तलावांनासुद्धा अनेक ठिकाणी येथे दिसतात. महाराष्ट्रात वस्तीने व उत्पन्नाने सर्वांत मोठी ग्रामपंचायत आहे ती अकलूजला. वस्ती चाळीस हजाराचे जवळपास. या सर्वांमुळे दरारा. दराऱ्यामुळे सतत भीतीचे वातावरण. दबलेल्या वातावरणात इथले साम्राज्य चालले आहे. पोलीस-सरकारी अधिकारीही त्यामुळे दबकून. त्याचा फायदा शकररावाना होतो. आता तर महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे ते खजिन-दार ! म्हणजे सगळाच आनद !

माळशिरस तालुक्यात ६३ गावे, १४४ मतदानकेंद्रे व १ लक्ष १० हजारांवर मतदार. त्यात पश्चिम-पूर्व असे दोन भाग. त्यातही अकलूज, नातेपुते, बोरगाव, महाळुंगे, शिंदेवाडी, माळशिरस ही मतदारगड्याची मोठी गावे. या गावातीलच मतदार ५० हजारावर. एकूण मतदारांत सर्वसाधारणपणे धनगर ३० हजार, मराठा २५ हजार, हरिजन ३० हजार, माळी ३० हजार व इतरेजन १० हजार असे ठळक आकडे.

पश्चिम भागात शंकरराव केवळ चार आणे मतदान घेणार नाहीत, अशी आजची अवस्था तर पूर्व भागात निम्मेनिम. मतदान जरी ६० टक्के झाले तरी शंकरराव २२-२५ हजारापुढे सरकू शकत नाहीत. कारण गेल्या वर्षात येथील कार्यकर्त्यांनी जनता पक्षाचे तडक २५०० सदस्य केले व ४० गावात समित्या स्थापन करून गावोगाव 'जनता'चे काम हेतुतः चालविले आहे. आपल्या पायाखालची वाळू खरोखरीच सरकू लागली म्हणून शंकरराव हवालदिल झाले आहेत. जवळपास ते याच ठिकाणी 'ठाणवंद' झाल्याने वैतागले आहेत. आजवर भोगलेला एकछत्री अमल संपणार या धास्तीने त्यानी वेगळी चाल-चालविली आहे व त्यातूनच जनता पक्ष अध्यक्ष चद्रशेखर-प्रकरण झाले.

महत्त्वाचे राहिले. शंकरराव पाटलाविरुद्ध त्याचे प्रतिस्पर्धी शामराव पाटील (पाणीवकर) हे जनता पक्षातर्फे उभे राहिले आहेत व त्यांनी सबध तालुक्यात शंकररावांचे ठोकशाही विरुद्ध रान उठवून जनतेचा झेंडा उंचावल्याने त्यांचे भोवती शेकडो कार्यकर्ते उभे राहिले आहेत. गावोगाव सभा-भेटी आणि शंकररावाची झुड-गिरी मोडण्याचे आवाहन, यामुळे हा तालुका तापलाय. हे मात्र खरे की, शंकररावाना तुल्यबळ प्रतिस्पर्धी उभ्या महाराष्ट्रात जनता पक्षाला येथेच गवसला आहे.

श्री. शामराव पाटील यांच्या प्रचाराची सभा खा. चंद्रशेखर यांनी दि. १३ रोजी दुपारी घेतली; सभेस तुफान गर्दी. एक तर चद्रशेखर याचे घणाघाती वक्तव्य व तेही ठोकशाहीविरुद्ध. तशात चंद्रशेखर हे लोकशाहीचे पहारेकरी म्हणून तुफान गर्दी उसळली होती. सभेस खा-खू, हा-हू झालेच; पण सभा शांततेने पार पडली. सभेनंतर १९६२ चे अपक्ष उमेदवार शिवाजीराव भवानराव पाटील व शामराव पाटलासह चंद्रशेखर, शामरावाचे गाडीतून श्री. जयकुमार जोशी या कार्यकर्त्याकडे चहापानास निघाले असताना गाडी विजयसिंह वसति-गृहापाशी आली. तोच अचानक ४००-५०० च्या जमावाने दगडफेक सुरू केली आणि गाडीची काच खळककन् फुटली. कुणी काठ्या आपटतंय तर कुणी शिव्या मोजतय असा हगामा झाला आणि भिरभिरत एक दगड आला आणि त्याने चद्रशेखरांच्या डोक्याचा वेध घेतला. चंद्रशेखरांचे मानेवरून रक्ताचे थेंब घसरू लागले. तेव-ढ्यात परत दगड आला. त्याने मात्र झकास काम केले. कानामागे धप्प आवाज झाला. मग मात्र चद्रशेखर गाडीतून उतरले. त्या वेळी त्यांना दिसले की, आपल्याचबरोबर सभास्थानापासून गाडीत घुसलेले दोघे जण त्या मॉबमध्ये घुसून दगडफेक करीत आहेत. दगल वाढली. दगल चालू असताना पोलिस एकदम दक्ष अवस्थेत, तर एस्. आर. पी. भावावलेले. कुणीच काही करीना. परिस्थिती गंभीर वळण घेते. शेवटी कुठून तरी एक पोलीसअधिकारी आला. बहुधा इन्स्पेक्टर रँकचा त्याने चंद्रशेखरना एका बाजूला घेतले व सरकारी दवा-खान्यात नेले व औषध चालू केले. शामराव मधल्या रस्त्याने आपल्या थिएटरकडे जाऊ लागले. तोच त्यांच्या म्हणण्याप्रमाणे शंकरराव मोहिते पाटिलांची गाडी त्याचे गाडीला धडक

## तिकडे इंदिरा आणि संजय, इकडे सहकारमहर्षी आणि त्यांचा गोतावळा

मारण्यासाठी आली; परंतु शामरावांनी सफाईने धडक चुकविली. मोहिते पाटील सरकन निघून अकलूजबाहेर गेले. ( काँग्रेस कार्यकर्त्यांच्या म्हणण्याप्रमाणे आमदार–सहकारमहर्षी त्या वेळी वेळापूर ते परभणी या परिसरात होते. अतएव ते अकलूजला नव्हतेच, तर पोलिससूत्राकडून मोहिते पाटील गावातच होते, अशी माहिती ) मग मात्र पोलिसांनी त्या मॉबला पिटाळयास सुरुवात केली. शामरावाचे कार्यकर्तेच त्यात सापडले. चांगले पंचवीसजण लाठीमारात सापडले आणि अकलूज एकदम टेन्शनमध्ये आले. चंद्रशेखर यांनी पोलिसखात्याला फोन केला की, याची दखल घेणार की नाही ? पन्नालाल सुराणा व कुर्डुवाडीचे नगराध्यक्ष डॉ. कुतल शहा किरकोळ मुक्या मारावर बचावले.

आता अकलूज महाराष्ट्रातच नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यात गाजत आहे चंद्रशेखर अकलूजला सभेसाठी आले त्या वेळी कार्यकर्त्यांनी त्यांना कल्पना दिली होती की, काँग्रेसचे गुड गडबड करणार आहेत, कारण गावातील दुकानात, बाजारात एकही गोफण शिल्लक नाही ! म्हणून चंद्रशेखर यांनी महाराष्ट्राचे मुख्य मंत्री श्री. वसंतदादा पाटील व मुख्य निवडणूक आयुक्त श्री. शकधर यांना सभेपूर्वी तारा केल्या होत्या. तारेत चंद्रशेखर लिहितात–

" Congresmen indulging in terrorism and goondaism in Malshiras constituency. Put stop to it [ stop ] Referring matter to election Commissioner.

**–Chandrashekar**
**President, Janta Party.**

कागदी तारांचा उपयोग झाला असता तर १९६२ सालीच शंकरराव मोहिते संपले असते. त्या वेळी त्यांचे विरोधात अपक्ष म्हणून उभे राहिलेले उमेदवार शिवाजीराव भगवानराव पाटील यांना तब्बल साडेबावीस हजार मते मिळूनही हरावे लागले. कारण त्या वेळी शिवाजीरावांचे १५० कार्यकर्ते जखमी करण्यात आले होते काय झाले मोहिते पाटलांचे ? चंद्रशेखर यांचेवर झालेल्या हल्ल्यानतरही पोलिसाकडे लेखी फिर्याद दिली आहे, त्यात मोहिते पाटील यांचे दोन चिरंजिवांसह अनेकांची नावनिशीवार यादी दिली आहे. काय होणार आहे ? फक्त एकदाच शंकरराव मोहिते व त्यांचे सहकारी तुरुंगात टाकले गेले होते. फक्त एकदाच अन् तेही आजच्या पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी. म. गांधींच्या वधानंतर झालेल्या काही आगळिकीमुळे. शंकरराव मोहिते पाटील यांच्या दुर्दैवाने, आज पंतप्रधान मोरारजी देसाई ज्या पक्षाचे आहेत , त्या पक्षाच्या अध्यक्षावर मोहिते पाटलांच्या हस्तकाकडून आगळीक घडली आहे. ( तीस वर्षांनंतरचा केवढा योग ! ! ) तेव्हा सावधान मोहिते पाटील, सावधान ! जनतारूपी सुदर्शन चक्र सुटले आहे. तुम्ही कोठेही जा, कसेही जा. ते चक्र तुमचा शोध घेणार आहे, वेध घेणार आहे आणि तुमची ३० वर्षांची सर्व सत्ता पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे धडाधडा कोसळणार आहे ! सावधान ! !

□

---

## मुक्काम मुंबई

" बंडखोरांबद्दल काय ?" असा प्रश्न मुंबई जनता पक्ष अध्यक्ष डॉ. शांती पटेल यांना मी विचारला असता ते म्हणाले : " २५ तारखेपर्यंत एकही बंडखोर उरणार नाही याची मला १०० टक्के खात्री आहे !"
डॉ. शांती पटेल पुढे म्हणाले : " जनता पक्ष व शिवसेना युती व्हावी अशी विनंती करायला मनोहर जोशी व सुधीर जोशी माझ्याकडे आले होते. सेनेमुळे महाराष्ट्राचे आजवर अनहितच झाले. जो बाईंना पाठिंबा देण्यापर्यंत मिंधा होतो तो कसला मराठी माणूस ? "
मी आणखी एक प्रश्न विचारला. " जनता पक्षाच्या यादीत पूर्वीचे भ्रष्ट कॉंग्रेसजनही आहेत. त्यामुळे पक्षाची प्रतिमा खराब होणार नाही काय ? "

डॉ. शांती पटेल : " जर आम्ही जगजीवनबाबूंना स्वीकारतो तर मग इतर चुका झाल्या तर नवल काय ? पण आम्ही कमी चुका करायला हव्या व त्यांची किंमत मोजण्याची आमची तयारी असायला हवी !"

**—नितिन वागळे, मुंबई**

गेल्या अंकात पुणे, मुंबई आणि पश्चिम महाराष्ट्र या विभागातील मतदानाची आकडेवारी पाहिली. या ठिकाणी ...

## दक्षिण महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा

# महाराष्ट्रातील मतदान

## विभागवार विश्लेषण

वा. दा. रानडे

दक्षिण महाराष्ट्रातील तीन जिल्ह्यांपैकी सातारा हा अनेक मंत्र्यांचा जिल्हा. तेथे पहिल्या चार निवडणुकांत मतदान सतत वाढत गेले. (५८·९३, ६२·२६, ६७·८३, ७१·५०) १९७२ च्या निवडणुकीत मात्र ६६·१० टक्क्यापर्यंत घटले, आणि १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत ५४·५० टक्क्यापर्यंत खाली गेले. या जिल्ह्यात पहिल्या निवडणुकीत फक्त फलटण-माण मतदारसंघात ४९·५७ टक्के म्हणजे पन्नास टक्क्यापेक्षा कमी मतदान झाले. १९५७ च्या निवडणुकीत एकाही मतदारसंघात पन्नास टक्क्यांच्या खाली मतदान झाले नाही; पण १९६२ मध्ये माण हरिजन मतदारसंघात ते पन्नास टक्क्यांखाली गेले. या मतदारसंघात १९६७ च्या निवडणुकीत मतदान ५८ टक्क्यापर्यंत वाढले; पण १९७२ मध्ये ते ४४·०६ पर्यंत घटले. पाच निवडणुकांत ती सर्वांत खालची पातळी होती. माणमध्ये मतदान एवढे कमी का झाले, याचा शोध घ्यावयास हवा. कऱ्हाड–उत्तर हा यशवंतराव चव्हाणांचा मतदारसंघ. तेथे त्यांच्या मुख्य मंत्रिपदाच्या काळातील १९५७ च्या निवडणुकीत ८३ टक्के व १९६२ च्या निवडणुकीत ८२·०४ टक्के मतदान झाले. महाराष्ट्रातील ८० टक्क्यांवर मतदान झालेले जे चार-पाच मतदारसंघ आहेत त्यांपैकी हा एक आहे. चव्हाण लोकसभेत गेल्यावर या मतदारसंघाचे महत्त्व तुलनेने कमी होऊन तेथील मतदानही १९६७ मध्ये पाच टक्क्यांनी व १९७२ मध्ये आणखी पाच टक्क्यांनी घटले. या मतदारसंघातील सर्वांत कमी मतदान ६७·०६ टक्के १९५१–५२ च्या निवडणुकीत होते. कऱ्हाड–दक्षिण हा यशवंतराव मोहित्यांचा मतदारसंघ. कऱ्हाड उत्तरप्रमाणे येथे ८० टक्क्यांची पातळी ओलांडली गेली नाही तरी मतदान नेहमी ६७ टक्क्यापेक्षा जास्त होते. खटाव मतदारसंघात १९६७ मध्ये ८१·४५ टक्के मतदान झाले. त्यापूर्वीच्या निवडणुकीपेक्षा मतदानातील ही वाढ वीस टक्के होती. या मतदारसंघातून काँग्रेसचे श्री. चंद्रहार पाटील त्या वेळी निवडून आले होते. मतदान याच वर्षी एवढ्या मोठ्या प्रमाणात कसे वाढले, याचा सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे.

सांगली जिल्ह्याचा विशेष म्हणजे जतमध्ये १९७२ मध्ये झालेले ४२·४४ टक्के मतदान वगळता तेथे एकाही मतदारसंघात एकाही निवडणुकीत पन्नास टक्क्यापेक्षा कमी मतदान झालेले नाही. या आदिवासी मतदारसंघात अगदी पहिल्या निवडणुकीपासून मतदानात सतत घट होत गेलेली आहे. (६५·१७, ६०·६९, ७३·४१, ५३·१३ व ४२·४४) हा आदिवासी मतदारसंघ असला तर मतदान वाढण्याऐवजी त्यात सतत घटच का व्हावी, हा संशोधन करण्यासारखा विषय आहे. तासगाव मतदारसंघात १९५७ पासूनच मतदानाची ७० टक्क्यांची पातळी ओलांडली गेली व १९६२ मध्ये ८०·०२ टक्के मतदान झाले. १९६७ चे मतदानही जवळजवळ याच पातळीवर होते : १९७२ मध्ये त्यात सात टक्के घट झाली. वाळवा हा राजारामबापू पाटील यांचा मतदारसंघ तेथे १९६२ व १९६७ या दोन्ही निवडणुकांत अनुक्रमे ८२·५५ व ८२·४६ टक्के मतदान झाले. १९७२ च्या निवडणुकीत ते तीन टक्क्यांनी घटले. सांगली जिल्ह्याच्या सर्वच मतदारसंघात १९६७ च्या तुलनेने १९७२ च्या मतदानात घटच झालेली आहे.

कोल्हापूर जिल्ह्याचे मतदान पहिल्या चार निवडणुकांत सतत वाढत्या प्रमाणात होते. (५५·५०, ५९·६६, ६४·८४, ७४·०२) १९७२ मध्ये ते ७२·७१ टक्क्यांपर्यंत घटले. पहिल्या निवडणुकीत जिल्ह्याची सरासरी ५५·५० टक्के असली तरी शाहूवाडी (४२·०९), पन्हाळा–बावडा (३५·४२) आणि करवीर (४४·७१). या तीन मतदारसंघात ते पन्नास टक्क्यांपेक्षा कमी होते. यांपैकी शाहूवाडी व पन्हाळा-बावडा या दोन मतदारसंघात १९५७ मध्येही मतदान प्रमाण पन्नास टक्क्यापेक्षा कमीच होते. शाहूवाडीत ते आणखी एक टक्क्याने घटले. पन्हाळा बावड्यातील मतदानात मात्र तेरा टक्के वाढ झाली. शाहूवाडीचे मतदान १९६२ पासून सतत वाढत गेले.(५६·४१, ७१·५९, ७४·९०), शिराळे या श्री. रत्नाप्पा कुंभारांच्या मतदारसंघात १९६२ पासूनच्या निवडणुकांत मतदान ८० टक्क्यांच्या वर होते. (८६·४०, ८७·५८ व ८०·६७) कागल, शाहूवाडी, पन्हाळा, करवीर, कोल्हापूर शहर, गडहिंग्लज, चंद्रगड या मतदारसंघात १९७२ चे मतदान १९६७ पेक्षा जास्त होते. बाकी मतदारसंघात मात्र घट होती.

विदर्भातील नागपूर जिल्ह्यातल्या मतदानाचे अवलोकन करता असे दिसते की, तेथे पाच निवडणुकांत ५८, ६६·०२, ७१·७२, ६७·३५ व ६४·७५ याप्रमाणे मतदान झाले. १९६२ मध्ये मतदानाने

उच्चांक गाठला. त्यानंतर १९६७ मध्ये चार टक्के व १९७२ मध्ये आणखी तीन टक्के याप्रमाणे घट झाली. नागपूरची पुण्याशी तुलना करता जाणवणारा फरक म्हणजे पहिल्या निवडणुकीत पुण्यापेक्षा नागपुरात मतदान सहा टक्के जास्त झाले; पण १९५७ मध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या लाटेच्या काळात पुण्याने ७३·२५ टक्के मतदान करून उच्चांक गाठला. नागपुरात त्या वर्षी ६६·३० टक्के मतदान झाले होते. १९६२ च्या निवडणुकीत पुण्यात मतदान दहा टक्क्यांनी घटले तर नागपुरात सात टक्क्यांनी वाढून ७१·७२ वर गेले. पाच निवडणुकांतील नागपूरचा तो उच्चांक होता. पुण्याने १९६७ मध्ये पुन्हा ७० टक्क्यांची पातळी ओलांडली; पण नागपुरात ते ६७·३५ टक्के झाले. १९७२ च्या निवडणुकीत १९६७ च्या तुलनेने दोन्ही ठिकाणी घट झाली असली तरी नागपूरचे मतदान दीड टक्क्याने जास्त होते. (नागपूर ६६७५, पुणे ६५·२२) पहिल्या निवडणुकीत पुण्यातील दोन मतदारसंघात तसेच १९६२ मध्ये खडकी मतदारसंघात पन्नास टक्क्यांपेक्षा कमी मतदान होते; पण नागपूरच्या एकाही मतदारसंघात एकाही निवडणुकीत मतदान पन्नास टक्क्यांच्या खाली गेले नाही. नागपूर जिल्ह्यात मात्र पहिल्या निवडणुकीत हिंगणे (३६) व उमरेड (३१) या दोन मतदारसंघात पन्नास टक्क्यांपेक्षा कमी मतदान झाले. हिंगणे मतदारसंघ फक्त पहिल्या निवडणुकीतच होता. उमरेडमध्ये १९५७ च्या निवडणुकीत मतदान १४ टक्क्यांनी वाढले तरी पन्नासच्या आतच होते. पुढच्या तीन निवडणुकात मात्र ते ५५ ते ६० च्या दरम्यान होते. १९५७ च्या निवडणुकीत उमरेडशिवाय रामटेकमध्येही मतदान ४४·१०टक्के म्हणजे पन्नास टक्क्यांच्या आत होते. तेथेही पुढच्या तीन निवडणुकात ते पन्नास टक्क्यांच्या पुढे गेले. सर्वांत जास्त, ८३·५२ टक्के मतदान काटोळ मतदारसंघात १९६७ मध्ये झाले. श्री. जे. एस. चांडक हे अपक्ष उमेदवार त्या वेळी निवडून आले.

भंडारा जिल्हा मतदानहक्क बजावण्याच्या बाबतीत अधिक जागरूक दिसतो. १९६२ चा अपवाद वगळता तेथे प्रत्येक निवडणुकीत नागपूर जिल्ह्यापेक्षा अधिक मतदान झालेले आहे. सर्वांत कमी मतदान ५६·७८ टक्के पहिल्या निवडणुकीत तर सर्वांत जास्त ७०·९७ टक्के मतदान १९६७ च्या निवडणुकीत झाले. पहिल्या निवडणुकीत फक्त आमगाव मतदारसंघात ४४ टक्के म्हणजे पन्नास टक्क्यांपेक्षा कमी मतदान झाले. १९५७ च्या निवडणुकीत ते ३७ पर्यंत व १९६२ मध्ये ३५·४२ टक्क्यांपर्यंत घटले. त्यानंतरच्या दोन निवडणुकांत मात्र ते ५४·९३ व ६२·९८ याप्रमाणे वाढले. १९५७ मध्ये आमगावच्या जोडीला गोरेगावमध्ये मतदान ४७ टक्के म्हणजे पन्नास टक्क्यांच्या खाली होते. वास्तविक पहिल्या निवडणुकीत गोरेगावमध्ये ६४ टक्के मतदान झाले होते. त्यात सतरा टक्क्यांची घट का झाली, याचा शोध घ्यावयास हवा. पुढच्या तीन निवडणुकांत मात्र ते ५७·२४, ६९ ७०, ५८·५८ याप्रमाणे पन्नास टक्क्यांच्या वर होते; पण त्यातील चढ–उतार लक्षणीय आहे. १९५७ च्या मतदानाचा एक विशेष म्हणजे साकोळी व तिरोडा हे मतदारसंघ वगळता बाकी सर्व मतदारसंघांत मतदानात घट झाली आहे. १९६२ च्या निवडणुकीत मात्र आमगाव वगळता बाकी सर्वत्र मतदान वाढले. सर्वांत जास्त, पंधरा टक्के वाढ गोंदियामध्ये तर त्या खालोखाल चौदा टक्के वाढ तिरोड्यात झाली. या दोन्ही मतदारसंघांत पाच निवडणुकातील सर्वांत जास्त मतदान या वेळी झाले. (तिरोडा ७४·९१, गोंदिया ६८·८८) १९६७ मध्ये सर्वांत जास्त पंधरा टक्के वाढ अर्जुनीमोरगावमध्ये, तर त्याखालोखाल तेरा टक्के तुमसरमध्ये झाली. १९७२ च्या निवडणुकीत तुमसरचे मतदान चार टक्क्यांनी घटले; अर्जुनीमोरगावचे मात्र आणखी दोन टक्क्यांनी वाढले. अड्यार आणि अर्जुनीमोरगाव हे मतदारसंघ १९६२ पासून आहेत. तिन्ही निवडणुकांत तेथे मतदानाचा चढता क्रम आहे. साकोळी मतदारसंघातही मतदान सतत वाढत गेले आहे. (५३, ५५, ७१·६२, ७१·८७, ७७·७१)

चांदा जिल्ह्यामधील पाच निवडणुकातले मतदान ५७ ते ६६ टक्के या पातळीत आहे. सर्वांत जास्त ६६·०४ टक्के मतदान १९६२ मध्ये होते. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीतते ६७·५० टक्क्यांपर्यंत वाढले. पन्नास टक्क्यांपेक्षा कमी मतदान फक्त आरमोरी मतदारसंघात १९७२ च्या निवडणुकीत झाले. या मतदारसंघाचा एक विशेष म्हणजे १९५७ पासूनच्या निवडणुकात तेथील मतदानात सतत घटच होत गेलेली आहे. (६३, ५८·९१, ५७·५३, ४७·७०) पहिल्या निवडणुकीच्या वेळी हा मतदारसंघ नव्हता. मतदान सतत घटत आहे, हे राजकीय कार्यकर्त्यांच्या लक्षात आले नाही का? त्यांनी अनास्था का दर्शविली या प्रश्नांचा शोध घ्यावयास हवा. चांदा मतदारसंघातील मतदानाचे चढ–उतार लक्षणीय आहेत. पहिल्या निवडणुकीतील ५९ टक्के मतदानावरून १९५७ मध्ये मतदान दहा टक्क्यांनी वाढले. १९६२ मध्ये ते आणखी ७३·४५ पर्यंत वाढून त्याने उच्चांक गाठला; पण १९६७ मध्ये ते पुन्हा ६०·५७ टक्क्यांपर्यंत घसरले. १९७२ मध्ये त्यात फक्त दोन टक्क्यांनी वाढ झाली. ब्रह्मपुरी हरिजन मतदारसंघात १९६७ च्या निवडणुकीत मतदानात बारा टक्के वाढ होऊन ते सत्तर टक्क्यांच्या पातळीवर गेले आणि पुढच्या निवडणुकीत त्यात फक्त एक टक्का घट झाली. भद्रावतीमध्ये मात्र १९६२ च्या निवडणुकीत सत्तर टक्क्यांची पातळी ओलांडली गेली. १९६७ मध्ये मतदान जवळजवळ त्याच पातळीवर होते; १९७२ मध्ये ६६·५७ टक्क्यांपर्यंत घटले. तिटोची या आदिवासी मतदारसंघातील मतदान १९५७ मध्ये ५३ ७० टक्के होते. १९६२ मध्ये त्यात चौदा टक्के वाढ झाली; पण १९६७ मध्ये ते पुन्हा ५३ टक्क्यांपर्यंत घसरले. १९७२ मध्ये तीन टक्क्यांची वाढ झाली तरी १९६२ ची पातळी ते गाठू शकले नाही.

वर्धा जिल्ह्याचे मतदान प्रथमपासूनच साठ टक्क्यांच्या पातळीवर असून पहिल्या चार निवडणुकात ते सतत वाढत गेले. (६०.३१, ६३·६७, ७३.४६) १९७२ च्या निवडणुकांत मात्र त्यात चार टक्के घट झाली. फुलगाव आणि वर्ध्याच्या मानाने हिंगणघाट व आर्वी हे मतदारसंघ मतदानात पुढे आहेत. वर्धा व पुलगावमध्ये

पृष्ठ २७ वर

**भंडारा जिल्हा मतदानाच्या बाबतीत अधिक जागरुक दिसतो.**

# निवडक ‘जनता’ उमेदवारांचा परिचय




## राम नाईक

**बोरिवली**

जनता पक्षाच्या मुंबई शाखेचे चिटणीस श्री. राम नाईक हे जनता पक्षातर्फे बोरिवली मतदारसंघातून उभे आहेत. परिस्थितीची फारशी साथ नसूनही कायद्याच्या पदवीपर्यंत शिक्षण पुरं करणारे रामभाऊ हे बोरिवली भागातलं एक बहुरंगी व्यक्तिमत्त्व आहे. मुंबईच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक जीवनाशी गेली कित्येक वर्षं ते समरस होऊन राहिले आहेत. अनेक सामाजिक आणि सांस्कृतिक संघटनांमध्ये रामभाऊंनी काम केलं आहे. १९६५ मध्ये श्री. मृणाल गोरेंनी बोरिवली-गोरेगावसाठी आखलेल्या ‘पाणी—परिषदे’चे रामभाऊ खजिनदार होते. १९६९ मध्ये सुखाच्या नोकरीवर लाथ मारून रामभाऊंनी आपलं सर्व आयुष्य राजकीय आणि सामाजिक कार्यासाठी झोकून दिलं. आणीबाणीचे एकोणीस महिने म्हणजे रामभाऊंच्या श्रमांची, बुद्धीची आणि कल्पकतेची खरी कसोटी होती आणि रामभाऊ या कसोटीस पूर्णपणे उतरले. हा सबंध काळ भूमिगत राहून अनेक महत्त्वाची पत्रकं प्रसिद्ध करण्याचे काम त्यांनी केलं.

लोकसभा निवडणुकीनंतर झोपडपट्टी परिषद, अभ्यासवर्ग, कामगारांचे पुनर्वसनाचे प्रश्न, हाउसिंग बोर्डाच्या भाडेकरूंच्या समस्या इत्यादी विषयात रामभाऊंनी यशस्वी मार्गदर्शन केले आहे. ✲



## सदानंद वर्दे

**वांद्रा**

वांद्र्याच्या नॅशनल कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक असलेले श्री. वर्दे यांनी ४२ च्या स्वातंत्र्य संग्रामापासूनच अनेक राजकीय आणि सामाजिक चळवळींमध्ये पुढाकार घेतलेला आहे. शहरातल्या खुल्या जागांवरील अतिक्रमण आणि प्रदूषण यांविरुद्ध आवाज उठवणाऱ्या सेव्ह बँड्रा बीच, सेव्ह बॉम्बे कमिटी, सिव्हिक ट्रस्ट यांसारख्या संघटनांचे प्रा. वर्दे क्रियाशील कार्यकर्ते आहेत. तसंच स्थायी समिती, शिक्षण-समिती, स्थापत्यसमिती ( उपनगरे ) मुंबई विकास योजना समिती अशा मुंबईच्या नागरी समस्या सोडविणाऱ्या समित्यांचेही प्रा वर्दे क्रियाशील सदस्य आहेत.

आणीबाणीच्या काळात प्रा. वर्दे यांनी मिसाखाली सोळा महिने तुरुंगवास भोगला. आता लोकसभा निवडणुकीनंतर जनता पक्ष संघटना बांधण्यासाठी प्रा. वर्दे प्रयत्नशील आहेत. ✲



## सौ. जयवंतीबेन मेहता

**ऑपेरा हाउस**

सेवाभावी, सौजन्यशील स्वभाव आणि अपार परिश्रम यांच्या बळावर एक

मध्यमवर्गीय गृहिणी राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात किती उच्च पदी पोहोचू शकते, याचं आदर्श उदाहरण म्हणजे सौ. जयवंतीबेन मेहता. ऑपेरा हाउस विधानसभा मतदारसंघामधून त्या जनता पक्षाच्या अधिकृत उमेदवार म्हणून उभ्या आहेत.

यापूर्वी सौ. जयवंतीबेननी मुंबई महापालिकेच्या विविध समित्यांवर आणि एस्. एन्. डी. टी. विद्यापीठाच्या सल्लागार समितीवर विधायक कार्य केलं आहे. सध्या त्या महाराष्ट्र जनता पक्षाच्या कार्यकारिणीच्या तसंच निवडणूक समितीच्या सभासद आहेत. नुकतीच महाराष्ट्र शासनाने जयवंतीबेन यांच्या आजवरच्या कार्याचा गौरव करून त्यांना 'विशेष कार्यकारी दंडाधिकारी' ही सन्माननीय पदवी दिली आहे.

'जयवंतीबेन' या आपुलकीच्या आणि घरगुती नावाने त्या आज सर्वसामान्य जनतेस परिचित आहेत. इमारत-दुरुस्ती, पाणीपुरवठा, रस्ते-दुरुस्ती इत्यादी नागरी समस्यांपासून तर आग, अपघात, अतिवृष्टी यांसारख्या दैवी आपत्तींपर्यंत सर्व बाबतीत त्या जनतेला तत्परतेने आणि स्वयंस्फूर्तीने सहाय्य करीत आल्या असल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्याही दैनंदिन जीवनात एक मानाचं, आदराचं आणि जिव्हाळ्याचं स्थान जयवंतीबेनना प्राप्त झालं आहे. प्रखर तत्त्वनिष्ठा, समर्पित वृत्ती आणि अढळ श्रद्धा हे सौ. जयवंतीबेन मेहतांचे स्वभावविशेष आहेत. याचा पुरेपूर प्रत्यय आणीबाणीच्या काळात आला. एकोणीस महिन्यांचा प्रदीर्घ कारावास त्यांनी मोठ्या धैर्यानं व शांत चित्तानं भोगला. *



# राजाराम शिंदे

**चिपळूण तालुका**

राजकारणातला माणूस कलेच्या प्रांतात वळण्याची शक्यता असते; पण कलेच्या प्रांतातल्या माणसाने राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात जाऊन तिथे भरीव कामगिरी करणं क्वचितच संभवतं. श्री. राजाराम शिंदे हे असंच एक व्यक्तिमत्त्व आहे.

'नाट्यमंदार' या व्यावसायिक नाट्यसंस्थेचे संचालक– सूत्रधार श्री. शिंदे यांनी आजपर्यंत 'मंदारमाला', 'मेघमल्हार', 'सागरा प्राण तळमळला', 'ही श्रींची इच्छा' यासारख्या समाजाला पूरक आणि लोकशिक्षण देणाऱ्या नाटकांची निर्मिती केली आहे.

स्वतःच्या कोळकेवाडी या गावापासूनच श्री. शिंदे यांनी आपल्या सामाजिक कार्याला सुरुवात केली. प्राथमिक शाळा, ग्रामपंचायतीची इमारत, ग्रामदेवतेच मंदिर यांच्या उभारणीस त्यांनी हातभार लावला. तसंच मुंबईकर रहिवाशांचे आणि ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे हार्दिक प्रश्न हक्काने सुटावेत आणि त्यातून छोटे-मोठे उद्योगधंदे तयार व्हावेत म्हणून तालुक्याची 'कोकण विकास सहकारी बॅंक' स्थापन करण्याचा प्रयत्न केला. भ्रष्टाचार आणि काळा बाजार याला आळा घालण्यासाठी ग्रामसुधार केन्द्राची श्री. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक गावी अकरा लोकांची एक समिती नियुक्त झाली. या समितीतर्फे खेड्यांना वीजपुरवठा, पिण्याचं पाणी, एस्. टी. स्टॅण्ड यांसारख्या सोयी उपलब्ध करून दिल्या गेल्या. तसंच वाढीव शेतसारा, जंगल जमिनी व रोड अतिक्रमण, जंगल लाकुडतोड कायदा यांसारखे शेतकऱ्यांचे प्रश्नही समितीने हाती घेतले. विशेष म्हणजे यासाठी होणारा खर्च 'नाट्यमंदार' च्या उत्पन्नातून केला जातो. याच ग्रामसुधार केंद्रातर्फे मौजे अलोरे येथे एक वैद्यकीय शिबीर विनामूल्य आयोजित करण्यात आलं होतं.

याव्यतिरिक्त आगामी काळात महागाई, भ्रष्टाचार तसंच शेतकऱ्यांचे दैनंदिन व ज्वलंत प्रश्न यांच्यावर तोडगा काढण्यासाठी श्री. राजाराम शिंदे प्रयत्न करणार आहेत. *



# शंकरराव धोंडो पाटील

**राधानगरी तालुका**

अफाट लोकसंख्या असणाऱ्या विशाल देशातील लोकशाही राजवटीत प्रत्येक व्यक्तीला देशाच्या कारभारात सदैव सक्रिय सहभागी होणं अशक्य आहे. त्यासाठी जनमानसाची जाण असलेला,


लोकांशी सदैव संपर्क असणारा, त्यांचे प्रश्न जाणून घेऊन ते सोडविण्यासाठी धडपडणारा असाच प्रतिनिधी जनतेचं नेतृत्व प्रभावीपणे करू शकतो.
श्री. शंकरराव धोंडो पाटील अशाच व्यक्तींपैकी एक आहेत.
नोकरीमुळे लोकांचे प्रश्न मांडणे व सोडविणे याला मर्यादा पडतात हे लक्षात आल्यावर १९६२ साली नोकरी सोडून श्री. शंकरराव समाजकार्यात पडले. त्यांनी सहकारी चळवळीत भाग घेण्यास सुरुवात केली आणि १९६४ साली राधानगरी तालुका खरेदी–विक्री संघाच्या कार्यकारी संचालकपदी त्याची नियुक्ती झाली.
धरणामुळे अनेकांची शेती फुलते; पण काहींची बुडतेही. राधानगरी धरणामुळे हाच प्रश्न निर्माण झाला. या धरणग्रस्तांची 'पाणी तुमच्या पिकाला नि आम्ही लागलो भिकेला' हा आर्त आवाज शंकररावांनीच अधिकारीवर्गापर्यंत पोचविला.
म्हणूनच काळम्मावाडी धरण प्रश्नाबाबत दिरंगाई होऊ लागल्यावर त्यासाठी झालेल्या १९७५ च्या ऐतिहासिक लढ्यात त्या लढ्याच्या कृतिसमितीचे सदस्य म्हणून श्री. शंकरराव सतत क्रियाशील राहिले.
तसंच जंगलग्रस्त शेतकऱ्यांना जीवन जगणं कठीण होऊ लागलं, तेव्हा त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा प्रश्न शंकररावांनीच धसास लावला.
'एक गाव एक पाणवठा' चे अध्वर्यू मा. बाबा आढाव यांच्यावरोबर भोगावती व दूधगंगेच्या परिसरात शंकररावांनी जनजागृतीची मोहीमही काढली.
आणीबाणी विरुद्धही शंकररावांनी आवाज उठवला आणि त्याचा परिणाम म्हणून १६ ऑक्टोबर १९७५ ते २६ जानेवारी १९७७ पर्यंत तुरुंगवास भोगला.
अशा तऱ्हेने दोन तपाहून अधिक काळ राजकीय आणि सामाजिक कार्यासाठी व्यतीत करणारे श्री. शंकरराव धोंडो पाटील हे राधानगरी तालुक्याचं आशास्थान बनून राहिलं आहे. *



## कमल देसाई

**मालाड**

येत्या विधानसभा निवडणुकीसाठी जनता पक्षाने मालाड मतदारसंघातून श्रीमती कमल देसाई यांची उमेदवारी जाहीर केली आहे. कमलताई गेली पंचवीस वर्षे सार्वजनिक जीवनातील विविध क्षेत्रांत निष्ठेने आणि निरपेक्षपणे काम करीत आहेत.
१९७३ पासून मुंबई महानगर पालिकेच्या गोरेगाव पूर्वच्या नगरसेविका म्हणून त्या काम करत आहेत विशेषत: झोपडीविभागात पाणी, नळ, संडास व इतर सोयी मिळवून देण्यासाठी त्या सतत प्रयत्न करत असतात. महागाई प्रतिकार समिती या लढाऊ महिला आघाडीच्या कमलताई गेली चार वर्षं सेक्रेटरी आहेत.
माध्यमिक शिक्षणाच्या नव्या योजनेमुळे निर्माण झालेल्या अडचणी त्यांनी विद्यार्थ्यांची शिष्टमंडळे शिक्षणमंत्र्याकडे नेऊन मांडल्या. संयुक्त महाराष्ट्राचा लढा, दिल्ली मोर्चा, कच्छचा सत्याग्रह, महागाईविरोधी आंदोलनात भाग घेतल्यामुळे कमलताईंनी वेळोवेळी कारागृहवास सोसला आहे. आणीबाणी–काळातही त्यांना सोळा महिने मिसा कायद्याखाली स्थानबद्ध व्हावं लागलं.
अशा तऱ्हेने राजकीय, आर्थिक, सामाजिक कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी श्रीमती कमल देसाई यांनी प्रभावीपणे काम केलं आहे. त्यासाठी आणि सामान्य जनतेच्या अडीअडचणींना वाचा फोडण्यासाठी कमलताई आता पुन्हा त्यांचं प्रतिनिधित्व करत आहेत. *



## बाबुराव सामंत

**गोरेगाव**

गेली तीस वर्षं गोरेगावच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात सातत्याने काम करणारे श्री. प. बा. ऊर्फ बाबुराव सामंत गोरेगाव मतदारसंघातून जनता पक्षातर्फे निवडणूक लढवत आहेत. गोवामुक्ती, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन व कच्छ

# जनआंदोलनात आघाडीवर असलेले 'जनता' उमेदवार


सत्याग्रह या राष्ट्रीय लढ्यांत, तसंच महागाई, भ्रष्टाचार व अन्यायाविरुद्ध झालेल्या अनेक सामाजिक लढ्यांत भाग घेऊन बाबुरावांनी शिक्षा भोगली आहे.
१९७४ मध्ये झालेल्या प्रभावी रेल्वेसंपातील प्रमुख सूत्रधारकांपैकी बाबुराव हे एक होते. बॅक-बेची भ्रष्ट योजना व उद्योगपतींसाठी होणारी 'नवी मुंबई' योजनेला त्यांनी गेली सात वर्षं कसून विरोध केला आणि जनमत जागृत केलं. पाणी, झोपडी, भाडेकरू, गृहनिर्माण परिषदा घेऊन सामान्य माणसांचे प्रश्न सोडवण्यात बाबुरावांनी सतत पुढाकार घेतला. महानगरपालिका येण्यापूर्वी गोरेगाव ग्रामपंचायतीचे सरपंच असताना सामंतांनी सर्वप्रथम सार्वजनिक नळ घालून रहिवाशांना मोफत पाणी उपलब्ध करून देण्याची योजना अंमलात आणली.
ग्रामपंचायतीच्या सेवेत असलेल्या हरिजनांसाठी घरं बांधणे, नागरिकांना सार्वजनिक बगीचा उपलब्ध करून देणं व श्रमदानाने लोकल बोर्डाच्या प्राथमिक शाळेसाठी वर्ग बांधून घेणं अशा अनेक योजना बाबुरावांनी पुढाकार घेऊन कार्यान्वित केल्या.
अशा अनेक तऱ्हेने गोरेगावच्या सामाजिक जीवनाशी जुन्या काळापासून समरस झालेल्या बाबुराव सामंतांनी गोरेगावातील मतदारांमध्ये स्वतःचं निराळं असं व्यक्तिमत्त्व निर्माण केलं आहे *



## गुणवंत सरोदे

**रावेर**

विधानसभेच्या येत्या निवडणुकीत रावेर मतदार संघातून श्री. गुणवंत सरोदे जनता पक्षातर्फे उमेदवार म्हणून उभे आहेत. एका सामान्य शेतकरी कुटुंबात जन्म घेऊन श्री. गुणवंतरावांनी एम्. बी. बी. एस्. पर्यंत शिक्षण घेतलं आणि या शिक्षणाचा उपयोग ते मुख्यतः दुर्बल व मागासलेल्या घटकांना मोफत वैद्यकीय सल्ला आणि उपचार यासाठी करतात. फैजपूर महाविद्यालयातल्या राष्ट्रीय सेवा योजनेतल्या विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी डॉक्टरसाहेब गेली पाच वर्षे मोफत करीत आहेत. तसंच हुंडाविरोधी मोहिमेत डॉक्टरांनी स्वतः सभा घेऊन हुंडापद्धत बंद व्हावी, म्हणून सतत प्रयत्न केले आणि अजूनही करीत आहेत.
डॉक्टरसाहेब सत्ता हे लक्ष्य मानीत नाहीत, तर जनसेवेचं आणि सामाजिक समस्या सोडविण्याचं ते एक माध्यम मानतात. निवडून आल्यावरही त्यांचं तेच मुख्य उद्दिष्ट राहणार आहे. *



## किसनराव डावखर

**चांदवड**

चांदवड मतदारसंघातील श्री. किसनराव डावखर यांचा जन्म एका अत्यंत गरीब शेतकरी कुटुंबात झालेला. त्यामुळे लहानपणापासूनच गरीब आदिवासी, हरिजन, गिरिजन, शेतमजूर यांच्याविषयी त्यांना विशेष सहानुभूती आहे.
चांदवड तालुक्यात त्यांच्या प्रेरणेने अनेक छोटे-मोठे पाझर तलाव, बधारे, सामुदायिक विहिरी, रस्ते अशी अनेक समाजोपयोगी कामं झाली आहेत.
१९७३ साली महाराष्ट्रामध्ये पडलेल्या भयानक दुष्काळात किसनरावांनी फार मोलाची कामगिरी बजाविली. ओझरखेड धरणाचं पाणी चांदवड तालुक्याला मिळावं म्हणून गेली सात-आठ वर्षं श्री. किसनराव सनदशीर मार्गांनी प्रयत्न करीत आहेत.
याच भांडवलावर तालुक्यातील दोन मातब्बर श्रीमंत उमेदवारांशी श्री. किसनराव यशस्वी टक्कर देत आहेत. *

[ आणखी काही परिचय पृष्ठ ३० वर ]

# दुष्काळ-निर्मूलन, रुग्णसेवा....' जनता ' उमेदवारांची कार्यक्षेत्रे.

# अशी रंगली पुणे निवडणूक


ही गर्दी काही कुणाला
'पहायला' नक्कीच जमलेली नाही!
कारण ना. मोहन धारियांचा आपल्या
मतदारसंघातला जनसंपर्क
मूळचाच भक्कम आहे.



ना. धारिया
आणि उपमहापौर
अण्णा जोशी
शनिवारवाड्याजवळच्या
दक्षिणमुखी
मारुतीजवळून
निघालेल्या
पदयात्रेच्या
तयारीत अन्य
सहयात्रिकांसमवेत....

••

इथले उमेदवार
आहेत अर्थातच
डॉ. अरविंद लेले



'जनता' उमेदवाराला
जनसंपर्क
साधायला हवाच.
श्री. सुभाष सर्वगोड
मतदारांकडून
शुभेच्छा
स्वीकारताना.

# 'जनसंपर्क'



आपल्या पदयात्रेत
नरपतगिरि चौकात
एका मतदार
भगिनीशी बोलताना
भाई वैद्य.



# पदयात्रांवर नेहमीपेक्षा अधिक भर...

हे या निवडणुकांचं
वैशिष्ट्य म्हणता येईल का?
'विनोबा एक्सप्रेस' व्दारा
मुंबईला पोचू इच्छिणारे
श्री. सुभाष सर्वगोड.





श्री. सर्वगोड यातनं
मुंबईला जाऊ शकतीलही.
पण ही काही
'विनोबा एक्सप्रेस' नव्हे.
ना. धारियांच्या संगतीत
त्यांची ही जीपयात्रा.
पदयात्रेचा एक अभिनव प्रकार!
शेवटी साध्य महत्त्वाचं, नाही का?
साधन कुठलंही का असेना!

# शस्त्राघाता मौनची उत्तर!

अेक मूक यात्रा
खा. चंद्रशेखर
यांच्यावरच्या
विश्वासघातकी
हल्ल्याच्या निषेधार्थ
'हमला चाहे जितना हो
हात हमारा नही उठेगा!'




मोर्च्याच्या मध्यभागी एका फळीत सर्वश्री सुभाष सर्वगोड, अरविंद लेले, भाई वैद्य आणि अण्णा जोशी

## ● श्री. सुरेश कलमाडी कॉफी हाउस ते कॉंग्रेस हाउस...प्रवास.

हा आणीबाणीत सुखरूप पार पडला. आता कॉंग्रेसभवनातून विधानभवनात पोचणार?




ज्ञानेश्वर पादुका चौकातल्या त्यांच्या प्रचार सभेत भाषण करताना श्री. सुरेश सोनवणे कॉंग्रेसचे एक तरुण खंदे वक्ते.



ग्रुप फोटोच. पण
जरा वेगळ्या प्रकारचा
जनता पक्षाला पाठिंबा
व्यक्त करण्यासाठी
पुणे रेल्वे स्टेशनवर
झालेली हमालांची सभा.
इथे वक्ते होते:
डॉ. बाबा आढाव
आणि भाई वैद्य

• तळागाळाच्या
माणसापासनं
उभा राहिलेला
जनता पक्ष

**एक नवी जाणिव...**
आत्मीय जाणिव...

## याच प्रचार सभेतला अबालवृद्ध श्रोतृवृंद...

आजची बालकं...
उद्याचे नागरिक...
बहुसंख्येने हजर!

कलमाडीजी, बाल-
कॉंग्रेसची आखणी
सुरू होतेय की काय?
की ही उद्याच्या
युवक कॉंग्रेसची
पायाभरणी?





आपल्यावर
विश्वासदर्शक ठराव
वगैरे मंजूर करून घ्यायची
काहीच चिंता
कर्पूरी ठाकूरजींना
इथं करायला नको!
कारण ही गर्दी त्यांच्यावरच्या
विश्वासामुळंच इथं जमलीय...
त्यांना पहायला
आणि ऐकायला सुद्धा.




आणि हे कर्पूरीजी ठाकूर,
बिहारचे मुख्यमंत्री
प्रत्यक्ष बोलताना...
चारित्र्य, त्याग आणि
तळमळ यांचा संगम.

त्यांच्या बाजूला
बसलेले आहेत
श्री. भाई वैद्य

कस्तुरे चौकात
गाजलेल्या याच सभेत
बोलताना डॉ. बाबा आढाव
असे वक्ते...
अशी व्याख्यानं...
असा अभिनिवेश!







आणि स्वतः
उमेदवार भाई वैद्य
इतक्या त्वेषानं
**काय बरं सांगत असावेत?**
नवनिर्माणाच्या योजना?
की आणीबाणीतील्या
अत्याचारकथाच?

स्त्री-पुरुष ही फक्त संसाररथाचीच का, जनता पक्षरथाचीही दोन (समान) चाकं आहेत. शिवाजीनगर मतदार-संघातल्या जनतापक्ष उमेदवार श्रीमती शांती नायक (मध्यभागी) आपल्या स्त्री-पुरुष समर्थकांसमवेत पदयात्रेच्या प्रारंभी.



# पदयात्रा

ही मात्र खरीखुरी पदयात्रा.... सबा मतदारसंघातले जनता पक्ष उमेदवार श्री. अरविंद लेले आपल्या मतदारांना घरोघर जाऊन भेटताहेत. सोबत काळ्या टोपीत श्री. बबनराव गंजीवाले.



# आता फक्त शिक्कामोर्तब व्हायचं राहिलंय्!

**सतीश कामत**

रविवारचा दिवस. सकाळचे दहा–सव्वा दहा वाजले असतील. श्री. भाई वैद्य पदयात्रेला निघाले. भवानी पेठ मतदारसघातील जनता पक्षाचे अधिकृत उमेदवार. डॉ. देशपांडे, श्री. अरुण नवले, भाईंच्या सोमवार पेठ, रास्ता पेठ भागातील इतर अनेक कार्यकर्ते भाईंबरोबर–दोन पावलं पुढेच चालले होते. घराघरांत जाऊन सांगत होते, 'भाई वैद्य आपल्या भेटीला येत आहेत.' लोक कुतूहलाने घराच्या खिडक्यांमध्ये येत होते, दारात उभे राहात होते. भाई सर्वांना अभिवादन करत होते. एका घरामध्ये भाईंचे कार्यकर्ते शिरले. भाईंना आत बोलावल. हातावर साखर ठेवली. घरातले वृद्ध गृहस्थ म्हणाले, 'भाई, आमच्या घरातली चवदा मतं तुम्हाला!' एका जुनाट पडक्या वाड्यात आम्ही शिरलो. एकेका खोलीत एकेक संसार फुललेला होता. चौकामध्ये भाडी घासत बसलेल्या स्त्रिया भाईंकडे कुतूहलाने पहात होत्या. भाई नमस्कार करत होते. एका स्त्रीने भाईंना थाबायला सागितल. ती झटकन घरात गेली. निराजनाचं तबक घेऊन आली. भाईंना ओवाळलं आणि त्याच्याच हातात पाच रुपये ठेवले–'ही आमची आपली गरिबाची मदत!' भाई सद्गदित झाले. भाई दुकानामध्ये जात होते. दुकानमालकाआधी त्याच्या नोकराशी हस्तांदोलन करत होते. एका कोळशाच्या वखारीत भाई शिरले. हमाल कोळशाचं पोतं उचलत होता. भाईंनी त्याचा हात हातात घेऊन प्रेमभरानं दाबला. हमाल सकोचला. भाई मालकाकडे वळले.

त्या पदयात्रेमध्ये ही अशी दृश्य वारवार दिसत होती. आपला माणूस भेटल्याचा आनंद लोकाच्या चेहऱ्यांवर दिसत होता. भाईंचं ज्याच्याकडे लक्ष नव्हतं ते सायकलवाले, स्कूटरवाले भाईंना आडवे येऊन म्हणत होते, 'भाई, या वेळी सामना होऊनच जाऊ द्या!' मी एका मध्यमवयीन माणसाबरोबर चालतो होतो सहज त्याला विचारलं, 'या भागात कॉंग्रेसवाल्यांची फेरी झाली की नाही अजून?' 'अहो, ते कुठले इकडे यायला?' तो उसळून म्हणाला, 'त्या बबनरावाला काळा की गोरा कधी पाह्यला नाही. नेहमी त्यांची मोटार धूळ उडवत जाणार. जमीन टोचते त्यांच्या पायाला!' मी स्वत.शीच हसलो. इसम मिष्किल दिसत होता. 'अहो, आम्ही पाह्यलेला हा पहिला उमेदवार!'

यामुळेच की काय, भाईंचं सर्वत्र उत्स्फूर्त स्वागत होत होतं. स्त्रिया ओवाळत होत्या. पुरुषमंडळी निवडणूकनिधीत पैसे टाकत होती आणि पदयात्रेत सामील होत होती. लहान मुलाचा उत्साह तर अवर्णनीयच होता. जनता पक्षाचे झेंडे खाद्यावर नाचवत ती एकेक गल्ली पुढे पळत होती, भाई येत असल्याची वर्दी देत होती.

☐

दुसऱ्या दिवशी सकाळीच भाईंच्या घरी गेलो. आठ वाजले असावेत. माझ्याआधीच दोन–तीन मंडळी येऊन बसली होती. एक पेन्शनर होते. मगळवार पेठेत राहणारे. जनता पक्षाच्या सदस्यत्वाचा फॉर्म भरायला भाईंकडे आले होते. त्या पावतीवर त्यांना भाईंचीच सही हवी होती. भाई बाहेर आले. पेन्शनरकाकाना मोकळं केलं. प्रा. व्ही डी. देशपांडे आणि श्री. प्रकाश अकोलकर आले होते. भाईंना निवडणूक-निधी द्यायला. 'भाई, वीस तारखेनंतर सांगाल ती हमाली करायला तयार आहे!' व्ही. डी. म्हणत होते. भाईंशी चर्चा सुरू झाली.

'मी निवडणुकीला उभ राह्यच ठरवलं. कारण, मी जर निवडून आलो तर त्यामुळं मला अधिक व्यापक प्रमाणावर समाजकार्य करता येईल, असं वाटतं. दुसरं असं की, आता आयुष्यातली ती 'स्टेज' आली आहे, असं मी मानतो.

'प्रचारासाठी मी जेव्हा घरोघर हिंडतो, निरनिराळ्या गावी जातो तेव्हा माझ्या असं लक्षात येतं की, जनता-लाट अजूनही ओसरलेली नाही. जनतेचा उत्तम प्रतिसाद आहे. जनता पक्षाला पुरेशी संधी अजून दिलेली नाही, ती आपण दिली पाहिजे, अशी जनतेची भावना आहे. त्यामुळे जनता पक्ष पुण्यातल्या सहाही जागा जिंकणार, याबद्दल मला सदेह नाहीच, पण महाराष्ट्रात सत्तेवरही जनता पक्ष येणार, असं मी खात्रीनं सागू शकतो.

'तुम्ही मघाशी प्रतिसादाबद्दल बोलत होता. आता माझेच काही अनुभव सांगतो. आम्ही हमाल पंचायतीमध्ये सभा घेतली. सभेमध्ये आम्ही अस आवाहन केलं की, 'जनता पक्षाकडे निवडणूक लढवायलादेखील पैसा नाही. तेव्हा आपण यथाशक्ती मदत करावी!' आणि तुम्हाला आश्चर्य वाटेल, सभा सपता सपता जमलेल्या सर्व हमालांनी मिळून रोख ६३४ रुपये आमच्या हातात ठेवले. आता माझ्या भागातल्या काही शिप्यानी जनता पक्षाचे कापडी फलक मोफत शिवून दिले. या फलकांसाठी लागणारं बॅटम काही टिंबर मर्चंटसूनी जनता पक्षाला मदत म्हणून मोफत पुरवलं. काही पेंटसंनी हे फलक जनता पक्षावरील प्रेमाखातर मोफत रगवून दिले. जनतेच्या प्रतिसादाची याहून आणखी कोणती पावती तुम्हाला पाहिजे?

'माझ्या मतदारसघात एक लक्ष आठ हजार मतदार आहेत. त्यामध्ये झोपडपट्टीत राहणाऱ्या मतदाराचीच सख्या पचवीस हजाराच्या घरात आहे. याव्यतिरिक्त, कामगार आहेत, व्यापारी आहेत, हमाल मडळी आहेत, कोरेगाव पार्कसारखे बगलेवाले आहेत; पण यापैकी कोणत्याही स्तरामध्ये फिरत असताना

मला एकच गोष्ट वारंवार जाणवते; ती म्हणजे, जनतेची जनता पार्टीला बांधिलकी आहे. जनता पक्षाला सत्तेवर आणायच, हे लोकानीच ठरवलय.

'शेवटी मी मतदारांना असं आवाहन करू इच्छितो की, तुम्ही महाराष्ट्रात जनता सरकार आणण्याचा निश्चय केलेला दिसतो. अभिनंदन! पण तुम्ही ही जी जागरूकता दाखवीत आहात ती निवडणुकीपुरतीच ठेवू नका. ती कायम टिकली पाहिजे. या देशात लोकशाही सबळ करण्यासाठी तिचा उपयोग झाला पाहिजे. उमेदवाराला मत दिलं म्हणजे सत्ता आणि कामाच कॉन्ट्रॅक्टच त्याला दिल ही भावना नष्ट झाली पाहिजे. या प्रतिनिधीला पुढेही साथ देत राहाणं हे तुमच कर्तव्य आहे!'

¤

बुधवारी दुपारी भाईंची नरपतगीर चौकातून पदयात्रेला सुरुवात होणार होती. मी थोडासा आधीच तिथे पोचलो होतो. भिंती रंगविलेल्या दिसत होत्या. एका भिंतीवर लिहिल होतं–

'कॉंग्रेसचं मोडलं बिऱ्हाड
निवडून कसे येणार किराड ?'

मला त्यातली सत्यता जाणवू लागली होती.

¤

त्या दिवशी 'साहेब' पुण्यात येणार होते. वाटेत अनेक ठिकाणी सभा घेत घेत येणार होते. कॉंग्रेसवाल्याच्या चेहऱ्यावर तजेला आला होता. रात्री दहा वाजता फडगेट चौकात 'जाहीऽऽर सभा' होती. मला जरा निघायला उशीरच झाला. म्हणून रिक्षा केली. 'फडगेट चौक' म्हटल्यावर रिक्षावाल्याने लगेच विचारलं, 'कुठं? साहेबाच्या सभेला का?' 'हो ना!' त्यावरूनच गप्पा सुरू झाल्या. रिक्षावाला कसबा पेठेत राहणारा होता. 'आमच्याकडे जोर मात्र डॉक्टराचाच आहे हां!' 'डॉक्टर?' 'आपले अरविंद लेले, हो! जनता पार्टीच्या तिकिटावर उभे आहेत ते!' रिक्षावाला आपुलकीने बोलत होता. 'पण, एकदर पुण्यातले रिक्षावाले काय म्हणतायत?' मी हळूच पिल्लू सोडलं. 'तसं काय, निम्मानिम आहे; पण जनता पार्टीला चान्स दिला पायजे, अस अनेक जण म्हणतात. आता तुम्हाला कॉंग्रेसचे झेंडे लावलेल्या रिक्षा जास्त दिसतील; पण त्याचं काय आहे, वीस रुपये कोण सोडणार? अहो, हाच टायम असतो, धंदा करून घेण्याचा!' रिक्षा फडगेट चौकात आली. मी रिक्षावाल्याला पैसे दिले आणि खाली उतरलो. तर तोही माझ्याबरोबर सभेलाच निघाला. 'चला, बघू तर खरी, साहेब काय म्हणतात ते. आपल्याला काही द्यायचं म्हणतायत का!' तो रिक्षावाला म्हणजे अस्सल पुणेकराचा नमुना होता

¤

दुसऱ्या दिवशी सकाळीच आमच्या फोटोग्राफरकडे–गोडांबेंकडे गेलो होतो. कसबा पेठेतच स्टुडिओ आहे त्यांचा. मला साहेबाच्या सभेचे फोटो हवे होते; पण दुकान अजून उघडलं नव्हत. मी कोपऱ्यावरच्याच उडप्याच्या हॉटेलात जाऊन बसलो. समोर एक मारवाडी गृहस्थ येऊन बसले. 'काय शेटजी, तुमच्या भागात इलेक्शनचा जोर कसा काय आहे?' मी चहा पिता पिता टाइम-पासचं साधन शोधून काढल 'इलेक्शनचा जोर तसा ह्याये म्हना. पन अजून तेवढा रग भरला नाय. आमच काय म्हणनं की, पैसे खा, पण जनतेचे हाल करू नका! कारभार व्यवस्थित करा! धंदा काय आमी बी करतो; पन सचोटीने करा!' शेटजीच्या शेजारी बसलेला माणूस हसू दाबायचा प्रयत्न करीत होता. 'हा, आता कोन जितनार म्हनाल तर आमाला तरी जन्ता पार्टीचाच जोर वाटतो. डाक्टरांचं काम बी मोट हाय आनी पुना जन्ता पार्टीचं तिकट.' 'पण शेटजी, तुमच्याकडे तर तिरंगी सामना आहे!' 'अवो कसले तिरंगी घेऊन बसले! तो शिवसेनावाला नुस्ती मतं खाईल डाक्टराशी सामना करतो होय! आता शेडगे तसा ह्याये म्हना. पन डाक्टर त्याला भारीच पडनार!' शेटजीचा चहा पिऊन झाला. टेबल आणि बाकातून स्वत:ला बाहेर ओढून काढत ते काउंटरकडे चालू लागले. मीही उठलो!

¤

संध्याकाळी एस्. पी. कॉलेजच्या मैदानावर चरणसिंगांची सभा होती. मैदान फुलून गेलं होतं. चरणसिंग सव्वा तास बोलले. त्यांच्याजवळ अटलजींसारख वक्तृत्व नाही; पण विचारातला ठोसपणा निश्चितच आहे रात्री साडेनऊ–पावणे दहाच्या सुमारास 'चौतीस बुधवारा' त गेलो. चौतीस–बुधवार म्हणजे डॉक्टराच्या कसबा पेठ विधानसभा मतदार संघाचं कार्यालय. 'रात्री कार्यालयातच या, म्हणजे निवांत बोलू!' डॉक्टरांनी फोनवर सांगितलं होतं, म्हणून गेलो. दहा–पंधरा मिनिटांत डॉक्टर आलेच. बरोबर त्यांचा 'बॉडी गार्ड' दीपक मांडके होताच. आमची चर्चेला सुरुवात झाली. डॉक्टर सांगू लागले–

'इतकी वर्षं मी कोणत्याही प्रकारच्या सत्तेपासून हेतुत:च दूर होतो. कारण सत्तेपासून दूर राहून संघटनेच काम करण मला अधिक पसंत होतं. परंतु या वेळी सहकाऱ्यांचा आग्रह झाला. तसच, सामाजिक कार्याला जनमान्यता मिळवून देण्यासाठी लोकप्रतिनिधी या क्षेत्राचा चांगला वापर करता येईल असं मला वाटलं, म्हणून मी या निवडणुकीला उभं राहायचं ठरवलं. शिवाय, सत्तालोलुप नसलेल्यांनी सत्तास्थान राबवायला काहीच हरकत नाही, असं मला वाटतं.

'आमच्या भागातली प्रचारमोहीम सहा फेब्रुवारीपासून सुरू झाली. लाखाच्यावर मतदार आहेत. सर्वांना भेटण्याचा प्रयत्न करतोय. आमच्या मतदारसंघाचं विशेष, म्हणजे जे सोळा वॉर्डस् या मतदारसघाच्या कक्षेत येतात त्या सोळाही वॉर्डस्मध्ये एकाच दिवशी उद्घाटनाच्या सभा झाल्या. अशा किमान शभर लहान-मोठ्या सभा घेण्याचा आमचा मनोदय आहे. कॉंग्रेसच नीतिधैर्य आता खचलं आहे. त्यामुळे आमच्यावर वैचारिक हल्ला कुणीच करू शकत नाही. सभांना जनतेचा प्रतिसाद उत्तम असतो.

'या निवडणुकीमध्ये एक गोष्ट माझ्या विशेषत्वाने लक्षात आली. ती म्हणजे लोकसभेच्या वातावरणापेक्षा आताचं वातावरण निराळं आहे. मतदान अधिक जाणीवपूर्वक, निर्भय अशा वातावरणात होईल. दुसर असं की, लोक संकुचित निष्ठांच्यावर विचार करायला लागल्येत. छोटं, संकुचित पातळीवरचं आवाहन त्यांना फारसं 'अपील' करू शकत नाही. मतदाराना जनता पक्षाबद्दल सहानुभूती आहे. केंद्रस्थानी असलेल्या जनता सरकारने फार काही केल नसलं तरी त्याबद्दल त्याला दूषणं देता येणार नाहीत, हेही लोक मान्य करीत आहेत. किमान निषे-

धाई असं तरी काही या पक्षाने केलेलं नाही, याबद्दल जनतेच्या मनात कृतज्ञता आहे थोडक्यात सांगायचं तर, यांनाही एकदा 'फेअर ट्रायल' दिली पाहिजे,' या मनःस्थितीत सध्या मतदार आहे. सर्वत्र 'जनता' भिमुख वातावरण आहे. महाराष्ट्रामध्ये तर लोक जनता पक्षाला सत्तेवर आणायला उत्सुकच आहेत. ही माणसं किमान वाईट करणार नाहीत, याची खात्री जनतेला आहे.

'आमच्या प्रचाराचा एक विशेष म्हणजे आमच्या मतदारसंघात कमीत कमी भिंती रंगविल्या आहेत. आमचा भर घरोघर जाऊन प्रचार करण्यावर आणि जास्तीत जास्त 'कॉर्नर मीटिंग्ज' घेण्यावर आहे. कसबा मतदारसंघ, पुणे शहराचा भौगोलिकदृष्टया विचार केला तर, मध्यभागी येतो. त्यामुळे त्या ठिकाणी घडणाऱ्या घटनांचा परिणाम इतरत्रही होतो. आम्ही आर्थिकदृष्टया कमकुवत आहोत; पण आमच्याकडे massive man power आहे. शेवटी मतं भिंती रंगवून किंवा बॅनर्स लावून बदलत नाहीत. घरोघर गेलं पाहिजे, मतदारांची मनं बदलण्याचा प्रयत्न केला पाहिजे, यावर आमचा पूर्ण विश्वास आहे आणि त्या दृष्टीनेच आम्ही प्रयत्न करत आहोत.'

◘

मंगळवार दि. १४ फेब्रुवारी शनिवार पेठेतल्या दक्षिणाभिमुखी मारुती मंदिरापासून शिवाजीनगर मतदारसंघातील जनता पक्षाच्या उमेदवार श्री. शांती नाईक यांच्या पदयात्रेला सुरुवात होणार होती. केंद्रीय व्यापार आणि पुरवठामंत्री श्री. मोहन धारिया हेही या पदयात्रेत सामील होणार होते. त्यामुळे संध्याकाळी पाच वाजल्यापासून शनिवार पेठेतला हा परिसर फुलून गेला होता. ही पदयात्रा शनिवार पेठ, नारायण पेठ आणि नवी पेठ अशा पुणे शहरातील तीन महत्त्वाच्या पेठांमधून जाणार असल्याने त्या तिन्ही भागातील जनता पक्षाची कार्यकर्तेमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती साडेपाच वाजता श्री. मोहन धारिया आले. जमलेल्या लोकांनी त्यांचं उत्स्फूर्त स्वागत केलं. पदयात्रेला सुरुवात झाली पदयात्रेच्या अग्रभागी श्री. मोहन धारिया, पुण्याचे उपमहापौर श्री. अण्णा जोशी, शिवाजीनगर मतदारसंघाच्या जनता पक्षाच्या उमेदवार श्री. शांती नाईक आणि जनता पक्षाचे इतर प्रमुख कार्यकर्ते होते. धारियाजी जनतेला नमस्कार करत होते हात हलवून नमस्काराचा स्वीकार करत होते. पदयात्रा फुटक्या बुरुजापाशी आली. इतक्यात जनता पक्षाची एक उघडी मोटार पदयात्रेत सामील झाली. श्री. मोहन धारिया आणि श्री शांती नाईक यांनी मोटारीत उभं राहावं, अशी विनंती जनता पक्षाचे कार्यकर्ते करू लागले. त्याच दिवशी सकाळी श्री. धारियांनी पर्वती मतदारसंघाचे जनता पक्षाचे उमेदवार श्री. सुभाष सर्वगौड यांच्या समवेत पर्वती भागात पदयात्रा केली होती; पण त्या वेळी ते चालले नव्हते. एका उघड्या जीपमध्ये श्री. धारिया आणि श्री. सर्वगौड उभे होते. या वेळी मात्र धारियांनी नम्र नकार दिला. ते पायीच चालू लागले. उघडी मोटार पुढे निघून गेली; जनता पक्षाचे झेंडे फडफडवत. पदयात्रा शनिवार पोलीसगेट चौकीसमोर आली. एक साठीच्या घरातले गृहस्थ सायकलवरून फूटपाथच्या कडेला उभे राहिले. 'धारियाजी, अहो धारियाजी.' त्यांनी प्रेमभराने हाक मारली. धारियांनी त्यांना पाहिलं. ते धावतच तिकडे गेले आणि त्या गृहस्थाने धारियांना चक्क मिठीच मारली. धारियाजींचे जुने स्नेही असावेत. पदयात्रेत ठिकठिकाणी लोक श्री. धारिया आणि शांती नाईक यांना हार घालत होते. त्यांचं स्वागत करीत होते. श्री. शांती नाईक सतत हात जोडून जनतेला अभिवादन करत होत्या. स्वतःला मिळालेले हार श्री. धारियाजी रस्त्याच्या कडेला उभ्या असणाऱ्या लहान मुलांच्या गळ्यात घालत होते. ती लहान पोरे खुप होऊन जात होती.

पदयात्रा नातू बोळातून लाखडे तालीम, पत्र्या मारुती, मोदी गणपती, माती गणपती या मार्गाने लक्ष्मी रोडकडे वळली. तिथून सरळ पुढे ज्ञानप्रबोधिनी प्रशालेवरून नवी पेठ विठ्ठलमंदिरावरून कै. लालबहादूर शास्त्री रोडवर आली. अलका टॉकीजजवळ पदयात्रेचं रूपांतर लहानशा सभेत झालं.

प्रथम पुण्याचे उपमहापौर श्री. अण्णा जोशी उघड्या मोटारीवर चढले. त्यांनी माईक हातात घेतला. ते बोलू लागले, 'मित्रांनो, मी आपल्यासमोर एक गोड गौप्यस्फोट करणार आहे. धारियाजींनी जरी ते गपित आपल्यापासून लपवून ठेवायचा प्रयत्न केला असला तरी आणि ते मलाही मागे ओढायचा प्रयत्न करत असले तरी मी ते गुपित आपल्याला सांगणार आहे. आपणा सर्वांचे लाडके नेते श्री. मोहन धारिया यांचा आज वाढदिवस आहे मी त्यांना आपणा सर्वांच्या वतीने शुभेच्छा व्यक्त करतो!' टाळ्यांचा कडकडाट झाला. 'धारिया झिंदाबाद'च्या घोषणा झाल्या. धारियाजींनी उघड्या मोटारीवर चढून अभिनंदनाचा स्वीकार केला

ही पदयात्रा फारच उत्कृष्ट झाली. तसंच प्रचाराच्या दृष्टीनेही ती अत्यंत उपयुक्त ठरली कारण एकाच फेरीत पुण्यातील तीन महत्त्वाच्या पेठा 'कव्हर' झाल्या. अर्थात हा भागच असा आहे की, इथे जनता पक्षाने एकही जरी पोस्टर लावलं नाही किंवा सभा घेतली नाही तरी जनता पक्षालाच लीड मिळेल. या पदयात्रेने त्यात भरच टाकली.

◘

आदल्याच दिवशी रात्री तुकाराममहाराज पादुका–चौकात शिवाजीनगर मतदारसंघातील कॉंग्रेसचे उमेदवार श्री. सुरेश कलमाडी यांची सभा होती. स्टेजवर श्री. सुरेश कलमाडी, सध्या कॉंग्रेसच्या प्रचारसभा गाजवत असलेले श्री. सुरेश सोनवणे, कु. रजनी पाटील आणि कॉंग्रेसचे इतर कार्यकर्ते बसले होते. सुरुवातीला कु रजनी पाटील यांचं भाषण झालं. त्यानंतर श्री. सुरेश सोनवणे बोलले. अगदी कॉंग्रेसच्या पुढाऱ्याला शोभेल असं बोलले– भरपूर तर्कविसंगत, विचाराची बैठक मुळीच नसलेलं. शब्दांच्या दोन–चार फालतू कसरती आणि कोट्या. त्यानंतर श्री. सुरेश कलमाडी उभे राहिले. माझी उत्सुकता शिगेला पोचली. कारण या 'देशभक्त वैमानिका'चं मला दर्शन या आधीही घडलं होतं; पण त्याचं बोलणं कधी ऐकलं नव्हतं कलमाडीसाहेब कोणत्या भाषेत बोलले ते मला अजूनही कळलेलं नाही. ते मराठी निश्चित नव्हतं कलमाडी म्हणाले–

'मतदार बंधु–भगिनींनो,

मी शिवाजीनगर मतदार संघातून कॉंग्रेसचं अधिकृत उमेदवार म्हणून उभं आहे. मी आपल्याला असं आश्वासन देतो की, या मतदारसंघाची प्रतिष्ठा वाढावी म्हणून मी 'अखेरचे' प्रयत्न करीन. (छान!) वेळ थोडा आहे. इतरही अनेक ठिकानी बोला-

यचं आहे. मी आपल्याला असं सांगतो की, आपन मला निवडून द्यावं '

अरे, नाही मराठी बोलता येत तर हिंदीतून बोल की ! ती पुढे बसलेली लहान लहान पोरंसुद्धा फिदी फिदी हसत होती बघ ! !

¤

साहेबांचं वक्तृत्व मला आवडलं. श्रोत्याला जिंकण्याचं कसब त्यांच्या वक्तृत्वात आहे. फडगेट चौकात सभा होती. मोठ्या अपेक्षेने आणि उत्सुकतेने गेलो होतो. आता साहेब काय बोलणार ? पुण्याचा श्रोता जिंकणं सोपी गोष्ट नाही. गर्दी फारशी नव्हती. दीड-दोन हजारांचा मॉब असेल. यापेक्षा कस्तुरे चौकातली बिहारचे मुख्य मंत्री श्री. कर्पुरी ठाकूर यांची सभा किती तरी मोठी झाली होती. त्या सभेत श्री. ठाकूर येईपर्यंत डॉ. बाबा आढावांनी किल्ला लढविला होता. श्रोत्यांना जिंकून घेतलं होतं. साहेबांच्या सभेची वेळ रात्री दहाची होती. साहेबांची 'इंपोर्टेड' मोटार रात्री साडेदहा वाजता धुरळा उडवीत फडगेट चौकात आली. साहेब सभास्थानी आले. निरनिराळ्या मंडळांतर्फे साहेबांना जाड-जाड, त्यांच्या आकारमानाला शोभतील असे हार घालण्यात आले. जनता पक्षाच्या सभा आणि काँग्रेसच्या सभा यांच्यामध्ये हा एक मोठाच फरक मला जाणवला. जनता पक्षाच्या सभेमध्ये कितीही मोठा नेता भाषण करायला आला असला तरी त्याला फक्त एक लहानसा गुच्छ देतात. ( काही वेळा तोही नाही. ) साहेबांच्या या सभेत मात्र हारांचा लहानसा ढीगच जमला होता.

कसबा पेठ मतदारसंघातील काँग्रेसचे उमेदवार श्री. उल्हास शेडगे यांनी प्रास्ताविक केलं. साहेब बोलायला उठले. कॅमेऱ्यांचा क्लिकक्लिकाट झाला. साहेबांनी सुरुवातीची दोन-चार वाक्यं बरी टाकली; पण अजून सभेला रंग चढत नव्हता. म्हणूनच साहेब वाक्यांचा सुंदर चढ–उतार करून, प्रभावी शब्दयोजना करून टाळ्या घेत होते; पण त्या बोलण्यामागे ठोस मुद्दे नव्हते, आत्मविश्वास नव्हता, विचारांचा पक्केपणा नव्हता. साहेबांनी जुनीच टेप लावली होती–' जनता सरकारला राजासारखं वागताच येत नाही; जनता सरकारच्या धोरणाला दिशा नाही; आम्ही गेल्या तीस वर्षांत काहीच का केलं नाही ? एक नवा हिंदुस्थान, नवा भारत घडविण्याचा आम्ही प्रयत्न केला.' वगैरे, वगैरे. अर्ध्या–पाऊण तासातच साहेबांनी आटोपतं घेतलं. या सभेमुळे प्रचाराच्या दृष्टीने तसं फारसं काहीच साध्य झालं नाही. थोडी करमणूक मात्र झाली. साहेब आले, साहेब बोलले. साहेब गेले ! बस्स्, एवढंच ! !

¤

कॅन्टोन्मेंट भागातून जनता पक्षातर्फे श्री. विठ्ठल तुपे निवडणूक लढवीत आहेत. बुधवारी त्यांची वॉर्ड क्र. दोनपासून एक पदयात्रा निघणार होती. मी थोडासा आधी गेलो. तिथे श्री. सुरेश गाटे नावाचे एक तरुण कार्यकर्ते भेटले. हा मतदारसंघ पुण्यातल्या कोणत्याही मतदारसंघापेक्षा अंदाज घेण्याच्या दृष्टीने कठीण आहे. कारण इथे झोपडपट्टीवाले आहेत, बंगलेवालेही आहेत, तामिळी आहेत, पंजाबी आहेत, ख्रिश्चन आहेत, पारशीही आहेत. मुस्लिमांचाही भरणा या भागात बऱ्यापैकी आहे. थोडक्यात सांगायचं तर, सर्व धर्म, जाती आणि पंथांच्या लोकांना हा भाग खुला आहे. त्यामुळे इथल्या मतदारांची नाडी ओळखणं कठीण जातं. याच संदर्भात श्री. गाटे यांच्याशी बोलत होतो, त्यांना मात्र या भागातून विठ्ठलरावच निवडून येणार, याविषयी कोणतीच शंका नाही. अर्थात हे विधान ते भावनेच्या भरात करीत नाहीत. गेल्या डिसेंबरातच कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या ज्या निवडणुका झाल्या त्या निवडणुकांच्या आधारावर गाट्यांनी हे गणित मांडलं आहे.

कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या निवडणुकीत सात जागांपैकी तीन जागा जनता कार्यकर्त्यांना मिळाल्या. त्यांचे जे चार उमेदवार पडले तेही ४८-९४-८५ अशा थोड्याच फरकाने पडले; पण त्यांनी ज्या जागा जिंकल्या त्या मात्र २००-२५०-५०० अशा भरघोस लीडने जिंकल्या. शिवाय या पडलेल्या चार उमेदवारांविरुद्ध जे उभे होते ते खरे जनता पक्षाचेच होते; पण त्या निवडणुकीत ते बंडखोर म्हणून उभे राहिले होते. या विधानसभेच्या निवडणुकीत मात्र ते श्री. विठ्ठल तुपे यांच्याच मागे उभे आहेत. त्यांच्या वतीने प्रचार करीत आहेत याचा फायदा विठ्ठलरावांना मिळाल्याशिवाय राहणार नाही आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे या मतदारसंघातील ९८ हजार मतदारांपैकी पस्तीस हजार मतदार या कॅन्टोन्मेंट भागातच आहेत. त्यामुळे जो इथे लीड मिळवील तो निर्धोकपणे निवडून येणार ! हे सगळं गणित पाहाता विठ्ठलरावांना ही लढत जड जाऊ नये.

¤

शेवटी एक गोष्ट नमूद केलीच पाहिजे. या वार्तापत्राच्या निमित्ताने मी पुण्यातल्या सर्व मतदारसंघामधून गेले आठ–दहा दिवस हिंडत होतो. अनेक सभा पाहिल्या. अनेक निवडणूक कचेऱ्यांमध्ये गेलो. मला या प्रचारकार्यात कसबा मतदारसंघाची कार्यकर्तेमंडळी सर्वांत जास्त efficient वाटली. त्यांच्याकडे मनुष्यबळही सर्वाधिक वाटलं. त्यात तरुणांचा भरणा सर्वांत जास्त आहे. साहजिकच कामाचा उत्साह आणि जोर उदंड ! !

भाई स्वत: प्रत्येक माणसाशी अत्यंत आस्थेवाईकपणे वागतात. हा खरोखर जनतेतून निर्माण झालेला कार्यकर्ता आहे त्यामुळेच भाईंच्या पदयात्रांना जो जिवंतपणा असायचा, लोकांकडून भाईंचं जितक्या प्रेमाने आणि आदराने स्वागत व्हायचं, तेवढं इतर कुठेच दिसलं नाही.

श्री शांती नाईकांनाही तरुणांचा उत्तम संच मिळाला आहे श्री. गिरीश बापट या तरुणांचा सूत्रधार आहे. त्यामुळे त्यांच्याही निवडणूक कचेरीत एक प्रकारची धावपळ, गडबड सतत चालू असते. शांतीबाई तशा अप्रसिद्ध आहेत; पण अण्णा जोशीसारखा खंदा माणूस त्यांच्या पाठीशी असल्यामुळे आणि जनता पार्टीतर्फे त्या निवडणूक लढवीत असल्यामुळे त्यांना ही निवडणूक जड जाणार नाही


कॅन्टोन्मेंट भागातल्या माणसांनी मात्र माझी थोडी निराशा केली. इथे उत्तरंही धडपणे मिळत नव्हती. श्री. पतंगे म्हणून या निवडणूक कचेरीचे प्रमुख आहेत; पण साहेब अमळ उद्धटच वाटले विठ्ठलरावांचे श्री. शांतिभूषण यांच्याबरोबरचे काही फोटो मला प्रसिद्धीसाठी हवे होते; पण श्री. प्रेम अडवानी नावाच्या एका सद्गृहस्थांनी आणि या पतंगेसाहेबांनी मला एकमेकांकडे टोलवत ठेवलं. शेवटी मी तो नाद सोडूनच दिला !

अर्थात हे असं चालायचंच ! इतकी माणसं एकत्र येणार, सतत धडपडत असणार, थोडी–फार अव्यवस्था आणि गैरसोय होणारच ! निवडणुकीच्या धामधुमीचाच आपण तो एक भाग मानायला पाहिजे. ☐

## पुणे शिवाजीनगर मतदारसंघ

# नाईकबाईंचा जोर वाढू लागला

**चंद्रशेखर पुरंदरे**



शांती नाईकांच्या तिकिटाचं राजकारण सर्वश्रुतच आहे. अण्णा जोशींचं तिथलं वजन चांगलं, पण ते पडले पूर्वाश्रमीच्या जनसंघाचे. एकाच शहरात दोन्ही जनसंघाचे कसे चालणार? म्हणून शांन्ती नायकाचं प्यादं सरकवलं गेलं आणि वातावरण अंमळ बिघडल. कॉंग्रेसवाल्याना एकदम पहिली फेरी जिंकल्याचा आनंद झाला; पण तो अल्पजीवी ठरला. पहिल्यांदा अशी हवा होती की, खिलारेंनी अपक्ष म्हणून उभं रहायचं आणि निषेध व्यक्त करायचा कर्वे रोडची झोपडपट्टी हा खिलारेचा बालेकिल्ला; पण अण्णा जोशीनी आपल संघाचं पाणी दाखवलं न् ते नि:स्वार्थीपणे बाईंच्या बाजून उभे राहिले. पहिल्यांदा जनसंघाचे लोक तर तटस्थ राहून मतदानही करणार नव्हते; पण तेही आता नांगरधारी शेतकऱ्याकडे वळले आहेत.

कलमाडी ही चीजच और आहे. यांच्या पूना कॉफी हाउसवर आणीबाणीत संजय गांधी न् इंदिरा गांधीची भलीमोठी पोस्टर्स लटकत होती. लोकसभेच्या निवडणुकांनंतर ती अडगळीत पडली, पण कलमाडीची इंदिरानिष्ठा अबाधित राहिल्यासारखं झालं. युवक कॉंग्रेस या एके काळी सर्वतोमुखी असणाऱ्या बदनाम, बेजबाबदार आणि तद्दन मूर्ख सघटनेचं नाव घेणंही कलमाडी आज टाळीत असले, तरी त्यांच्या दुर्दैवानं त्यांच्या निष्ठा आणि आता फिरवलेली पाठ लोक विसरलेले नाहीत. इंदिरा गांधीच्या अटकेनंतरचं काव्य आणि मोरारजींच्या आगमनानंतरचा फार्स या दोन घटना तर ताज्याच आहेत. पद्धतशीर गुंडगिरी ही आणीबाणीतली त्यांच्या अनुयायांची सवय बदललेल्या काळाशी सामावून घेऊ शकत नाही, असं दिसतं. कलमाडींनी मध्यंतरी शहाजोगपणे राजीनामा द्यायची तयारीही दर्शविली होती; पण त्यांनी राजीनामा देणे आजच्या दरिद्री अवस्थेतल्या कॉंग्रेसला आर्थिकदृष्टया परवडण्यासारखे नव्हते व नाही. म्हणजेच एक प्रकारच्या नाइलाजाने त्यांना पदावरही ठेवावे लागले अन् तिकिटही द्यावे लागले. नेमक्या याच गोष्टीने अस्सल कॉंग्रेसजन दुखावलेले आढळतात.

कलमाडीचे या भागात कार्य नाही ही वस्तुस्थिती. रक्तदान-शिबिरे चालविणे आणि जायंट्स् गर्भपात (जायंट्स् क्लबतर्फे गर्भपात) करणे हे फारच वरवरचे काम झाले. खऱ्या अर्थाने समाज बदलू शकेल अशा परिमाणाचे इथे कोणाचेच काम नाही त्यामुळे थातुर मातुर बाबींचे भांडवल करणे चालू आहे. कलमाडी एके काळी पायलट होते म्हणे. वस्तुत. यात उदोउदो करण्यासारखे काही नाही. एखादा मास्तर असतो, मोटारचा ड्रायव्हर असतो, तसा कुणी विमानाचा ड्रायव्हर असतो, पण त्याचाही राईचा पर्वत करण्यात येतो आहे.

शिवाजीनगरातून एकदा फेरफटका मारला तरी पैसा किती ओतला गेला आहे, याचा अंदाज येतो. झगमगत्या पार्श्वभूमीवरचं गाय-वासरू पांढऱ्या फलकांवरचं गायवासरू, काळ्या रस्त्यावरचं गाय-वासरू इ. इ. कमी म्हणून की काय, ६–७ पत्रकाचा एक संच कलमाडीच्या ज्ञात-अज्ञात कर्तृत्वाची माहिती उजेडात आणतो. इतके विनोदी वाङ्मय आज-काल पहायला मिळत नाही त्यामुळे एक संच जरूर चाळा. लहान मुलाचे हलव्याचे दागिने घालून फोटो काढावेत तसे कलमाडी विमानात, कलमाडी दुकानात, कलमाडी पाण्यात पहाताना, कलमाडी आरशात पहाताना, कलमाडी ह्याच्याबरोबर अन् कलमाडी त्याच्याबरोबर असे विविध पोझेसमधले फोटो तुमच्यासमोर येतात.

कलमाडीच्या कॉर्नर सभा हा तर स्वतंत्र विनोदाचाच विषय आहे. बहुतेक वेळा मोठ्या वक्त्याचे नाव जाहीर आणि वक्ता गुल. साहेब तेवढे मनापासून राबत आहेत. कारण त्यांच हे 'होम स्टेट'. साहेबांच्या सभाही पूर्वीसारख्या रंगत नाहीत आधी टाळकी तुरळक. त्यात लोक प्रचारसभाना विटलेले. घरात बसूनही ठणठणाट ऐकूच येणार तर गारव्यात तरी बसून ऐकू, या निरुपायाने ते बाहेर येऊन बसतात. साहेबांकडे ना तजेलदार व्यक्तिमत्त्व, ना लाचारीखेरीज कर्तृत्व. चरणसिंगासारख्याला सुद्धा दोन्ही डोळ्यानी पाहिल्यावर भाषण सुरू होतंय न होतंय तोच उठून जाणारे पुणेकर साहेबाना काय बघणार? त्यात परवापर्यंत इंदिरायने गाणारे कलमाडी त्यांच्या अफलातून मराठीतून (ती भाषा बॉसच आहे) इंदिरा कॉंग्रेसला शिव्या घालतात. त्यामुळे एकदम वातावरण फिरत वगैरे नाहीच. गुडलकवरची मगळवारची प्रचारसभा घ्या. प्रियरंजनदास मुन्शी येणार म्हणून लिहिलं होतं; पण साडेसहा ते साडेदहा (इथपर्यंत मी थांबलो. पुढे सभा चालूही असेल) एवढ्या अवधीत विविध रंगी, विविध ढंगी माणसे जगातल्या यच्चयावत विषयांवर बोलून गेली. भाषाही विभिन्न होत्या. शेवटी शेवटी आताचा श्रोता हा

नंतरचा वक्ता असती, असं लक्षात आल्यावर मी सटकलो.

या साऱ्याच प्रमुख कारण म्हणजे काँग्रेस-वाल्याकड जनता पक्षाची आजवरची पावलं कशी चुकीची आहेत आणि 'आम्ही इंदिरा गांधींना हाकलून कसे पवित्र झालो', या दोन मुद्द्यांखेरीज तिसरा मुद्दाच नाही.

'जनता'तल्या आतल्या मारामाऱ्यांचा एक मामला सांगायला हरकत नाही. जनता पक्षाच्या कार्यालयात दिवसभर मतदार-संघामध्ये राबणाऱ्या कार्यकर्त्याला चहापाणी, जेवणखाण मिळावं अशी अपेक्षा. पर्वतीच्या बाजूला रहाणारा एक कार्यकर्ता संघाचा. त्याला घरी जाऊन येणे गैरसोयीचे. म्हणून एक दिवस तिथला वॉर्डप्रमुख त्याला घेऊन कार्यालयात गेला, तर तिथल्या युवा जनताच्या कार्यकर्त्यानं 'पर्वतीच्या तिकडचा राहणारा, मग इकडं कशाला आला ?' वगैरे वक्तव्यानंच स्वागत केलं. म्हणजे तो बिचारा राबला हे बाजूलाच. तो संघाचा म्हणून त्याला अशी सापत्नभावानं वागणूक. याचा निषेध म्हणून या कार्यकर्त्यांनी एक दिवस सगळं काम बंद ठेवलं. मग बाबुराव नाईकांच्या तोडचं पाणी पळालं आणि ते घरोघर विनत्या करत हिंडले. त्याना उत्तर मिळालं, अण्णा जोशीना जाऊन सांगा. अण्णांनी सगळे जमवल्यावर मात्र रात्री बारानंतर काम पूर्ववत सुरू झालं. समाजवाद्यांनी इतकी फौज कधी पाहिली नाही; पण तरी त्याची मस्ती काही उतरत नाही. तर अशा आतल्या मारामाऱ्या. तरीसुद्धा गाय-वासराचा खिमा करायला हे लोक कबर कसून उभे आहेत.

कलमाडी मुख्यत्वेकरून वडारवाडी पोलिसलाइन या भागात जोरात आहे. कारण जबरदस्त प्रचार. हाच प्रचार मात्र बूमरँग होणार दिसतोय. प्रचार मात्र दणदणीत आहे. त्यांच्या पाच-सहा रिक्षांनंतर शान्ति नाईक बाईंची एखादी येऊन जाते, तीही कधीकधी हिन्दीतून ओरडत. या अस्सल मऱ्हाठी वस्तीत हिन्दीचा हा काय पुळका आहे ते तो शेतकरी जाणे. कर्वेरोडच्या झोपडट्टीवर खिलारेचं वर्चस्व आहे, प्रॉपर डेक्कन एरिया निळूभाऊ आणि समानपणे कलमाडी संभाळून आहेत. परत अण्णांचा एरिया आहेच. शिरोळ्यांनीही काँग्रेस सोडलीच आहे.

त्यात किल्लेदाराची माघारही महत्त्वपूर्ण. आता शेकापचा होल्ड तितका नसला तरी १९६७ ला किल्लेदार इथनंच जिंकले होते आणि काँग्रेसविरोधी मतेच फुटली असती, तो फाटाफूट टळली आहे.

एकूण आपल्यापेक्षा मोठ्यांच्या सहाय्याने नाईकबाईंनी जोरदार स्प्रिंट मारली आहे. *

## पर्वती सर्वगौडांना अनुकूल

पर्वतीची गंमत वेगळीच आहे. ही जागा राखीव आहे. जनताचे सुभाष सर्वगौड उभे आहेत. ते बऱ्यापैकी आघाडीवर आहेत असा प्राथमिक अंदाज वर्तवायला हरकत नाही.

याचं सरळ कारण अस की त्यांच्याविरुद्ध जे चौघं उभे आहेत ते सगळे केव्हा ना केव्हा काँग्रेसला शिवून आलेले आहेत. रेड्डी काँग्रेसचे शकरराव मात्रे हे अधिकृत उमेदवार. हे गृहस्थ पुण्याचे एके काळी उपमहापौर होते. ते स्वतः मातंग समाजाचे आहेत. त्यांच्याबरोबर तो गठ्ठा जाईल अशी शक्यता नाही. कारण सुभाष सर्वगौडांचा उजवा हात भीमराव पाटोळे हे मातग समाजाचेच आहेत. हिरामण जाधव हा अपक्षही मातंगांची मते खाईल. या राखीवमध्ये दलित जमातीत मातंगांची संख्या सर्वात जास्त म्हणून हा प्रश्न महत्त्वाचा. कट्टर मुस्लिमांची मने, जी एरवी काँग्रेसला गेली असती, ती जाणार चालूनाई बुद्धिवंत या इंदिरा काँग्रेसच्या उमेदवाराला. त्याचं कारण म्हणजे कट्टर मुस्लिम व फुटीर प्रवृत्तीचे अमिनुद्दीन पेनवाले भवानी पेठेतून उभे आहेत. ते शेजारच्या या मतदारसंघाला काही ना काही मदत करणारच. त्याखेरीज उभे आहेत सध्या भवानी पेठेतून आमदार असलेले टिकमदास मेमजादे. हे मूळ काँग्रेसचेच; पण तिकिटाचा लग्गा न लागल्याने अपक्ष. याची स्वत.ची जी काही मते असतील ती परत काँग्रेसचीच खाल्ली जाणार. त्यामुळे सर्वगौडांचे स्टार्स एकदम चमकायला लागलेत.

या मतदारसंघात उच्च मध्यम वर्गीय, (जो आदिनाथ सोसायटी, मीरा हाउसिंग सोसायटी वगैरेमधून रहातो तो) आणि एकदम दलित अशी दोन टोकं आढळतात. सर्वगौडांच्या मते उच्च मध्यमवर्गीयाला सांगण्याचीही जरूर नाही. त्याने जनताला मत द्यायचं हे ठरवूनच टाकलं आहे. आर्थिक दृष्ट्या मागासलेल्यांची विभागणी वर सांगितलीच. शिवाय काँग्रेसचे तीन नगरसेवक जनतात आल्यानं हा वर्ग बराचसा अनुकूल फिरेल. तसेच हे व इतरही इच्छुक कॉर्पोरेशनच्या निवडणुका वर्षावर आल्याने तिकडेही डोळा ठेवून. तेव्हा 'तिकिटाच्या वेळेला तेवढा आला.' असं व्हायला नको म्हणून आधीपासून काम करून ठेवत आहेत व लोकांसमोर यायची संधी साधत आहेत.

सर्वगौडाची पार्श्वभूमी पहाता त्यांना एकूण लढत फारशी जड जाणार नाही. मूळचे ते शिवसेनेचे. आणीबाणी सैल झाल्यावर आणि लोकसभेच्या निवडणुकीपूर्वी काका वडके, डॉ. तोडकर, देवीदास काटे यांच्याबरोबर जनतात सामील झाले. त्यामुळे त्यांचे बहुतेक कार्य जुन्या शिवसेनेचे कार्यच आहे. शिवसेनेच्या 'शिवसेवा' या अजिंक्याच्या मदतीसाठी उभारलेल्या संस्थेचे ते ट्रस्टी आहेत. ही शिवसेवा तीन लाखाच्या उलाढालीइतकी मोठी संस्था आहे आणि एक रुग्णवाहिका व एक शववाहिका संस्थेजवळ आहे भाववाढ विरोधी आंदोलन, पूरग्रस्ताचे पुनर्वसन ३० ठिकाणी त्यांचे कार्य आहे.

त्यांना सगळ्यात त्रासदायक जर काही जात असेल, तर म्हैसूर महाराष्ट्र आंदोलनात १९६९ साली त्यांना झालेली ३॥ वर्षांची शिक्षा आणि ३६००० रु. दंड ! पण ही शिक्षा राजकीय आदोलनात झाली होती. विरोधक मात्र सर्वगौड गुन्हेगार असल्याचे खुल्या आवाजात सागत आहेत. जर गुन्हेगारी कायद्याखाली अटक झाली असती, तर १९८० सालापर्यंत कोणत्याच निवडणुकीला त्यांना उभे रहाता आले नसते; पण निवडणूक कमिशनर शकधरांनीच वैयक्तिक स्वार्थ नसल्याची या प्रकरणी ग्वाही दिली आहे आणि महाराष्ट्र सरकारने मुदतीआधी सोडायला पाहिजे होते, असे मत व्यक्त केले आहे. तसेच त्यांच्या सुटकेसाठी तेव्हाचे आमदार रामभाऊ म्हाळगी, मृणाल गोरे, उत्तमराव पाटील, ग. प्र. प्रधान, रवींद्र मोरे वगैरे २५ आमदारांनी एक निवेदन दिलेले होते. □

महाराष्ट्रातील मतदान : पृष्ठ ८ वरून

फक्त १९६७ च्या निवडणुकीत मतदान ७० टक्क्यांच्या पातळीवर गेले होते. हिंगणघाटमध्ये ते १९५७ पासून सतत सत्तर टक्क्यांच्या पातळीवर आहे, तर आर्वीमध्ये १९६२ पासून ७३ ते ७५ टक्क्यांच्या आसपास आहे.

अमरावती जिल्ह्यात पाच निवडणुकांत ५७·२२, ६४·२४, ७५.५०, ६८·६१, व ६३·४६ असे मतदान झाले. यावरून १९६२ पर्यंत ते चढत गेले व पुढच्या दोन निवडणुकात बारा टक्क्यांनी घटले, असे दिसते. पाच निवडणुकात, फक्त मेलघाट आदिवासी मतदारसंघात पहिल्या निवडणुकीत ४८ टक्के आणि अमरावतीत १९५७ साली ४७·८० टक्के असे पन्नास टक्क्यांपेक्षा कमी मतदान झाले. मेळघाटच्या बाबतीत १९५७ मध्ये ५५·१० व १९६२ मध्ये ६८.७०, याप्रमाणे ते वाढले; पण १९६७ मध्ये पुन्हा ५३ टक्क्यापर्यंत घटले. १९७२ मध्ये त्यात सात टक्क्यांची वाढ झाली तरी १९६२ ची पातळी गाठली गेली नाही. अमरावतीत १९५७ मध्ये मतदान पन्नास टक्क्यांच्या खाली गेले तरी पुढच्याच निवडणुकीत ते २३ टक्क्यानी वाढून ७०·६० टक्क्यांपर्यंत गेले; पण ही प्रगती पुढे मात्र टिकली नाही. १९६७ मध्ये मतदान ५९·६४ टक्क्यांपर्यंत व १९७२ मध्ये ५२·२० टक्क्यांपर्यंत घटले. चांदूरमध्ये मतदान ६१,६४·१० ७५·९९ याप्रमाणे पहिल्या तीन निवडणुकांत वा त गेले. पुढील निवडणुकांत मात्र ७४·३३, ६७·६० अशी त्यात घट झाली. मोर्शीमध्येही मतदानाचा हाच क्रम; पण अधिक चढत्या–उतरत्या प्रमाणात आहे. (५८, ७३·८०, ८०.७७, ६९·७२, ६४.२७) १९६२ च्या निवडणुकीत तेथे मतदान ८०.७७ टक्क्यांच्या पातळीवर गेले. अचलपूरमध्येही थोड्या-फार फरकाने हाच क्रम दिसतो. दर्यापूरमध्ये असाच क्रम असला तरी मतदान ज्या प्रमाणात वाढले, त्या मानाने घट कमी झाली. पहिल्या तीन निवडणुकांत ते ४५, ६४·६०, ८६·३० असे वाढत गेले १९६७ मध्ये पाच टक्क्यांनी घटले तरी ऐंशीची पातळी टिकून राहिली. १९७२ मध्ये ते आणखी पाच टक्क्यांनी घटले. १९५१–५२ पासून मतदानात वाढ ३१ टक्के झाली; पण घट अकरा टक्क्यांचीच झाली. बडनेरामध्ये सर्वांत जास्त, ७३·७० टक्के मतदान १९५७ च्या निवडणुकीत झाले. त्यानंतरच्या निवडणुकांत ते ६९ ते ७१ च्या पातळीत होते.

बुलढाणा जिल्ह्यात पहिल्या चार निवडणुकात ५८·८५, ६४·६७, ७१·३५, ७४·३२ असे चढत्या प्रमाणात मतदान झाले. १९७२ मध्ये ते ६६.७३ टक्क्यापर्यंत घटले. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत ६३ पर्यंत घटले. पहिल्या निवडणुकीत मेहकर मतदारसंघांत ४८ टक्के म्हणजे पन्नास टक्क्यांपेक्षा कमी मतदान झाले होते. त्यानंतरच्या एकाही निवडणुकीत कोणत्याच मतदारसंघांत मतदान पन्नास टक्क्यांच्या खाली गेले नाही. मेहकरमध्ये पहिल्या चार निवडणुकांत ४८, ५६, ७६·१७ व ८०·२३ असा मतदानाचा चढता क्रम होता. १९७२ मध्ये मात्र ते ६९·२६ पर्यंत घटले. मेहकरने १९६७ च्या निवडणुकीत, तर चिखलीने १९६२च्या निवडणुकीत ८० टक्क्यांची पातळी ओलांडली. पुढच्या दोन निवडणुकात मात्र ते ७५·९० व ६७·१६ असे घटले. खामगावमध्ये पहिल्या निवडणुकीत ५७ टक्के मतदान झाले होते. १९५७ मध्ये त्यात पंधरा टक्के वाढ होऊन ७० टक्क्यांची पातळी ओलाडली. तीन निवडणुकांत ही पातळी टिकली; पण १९७२ मध्ये मात्र मतदान ६६ ०७ टक्क्यापर्यंत घटले.

अकोला जिल्ह्याचे मतदान फक्त पहिल्या निवडणुकीत ४२ टक्के म्हणजे पन्नास टक्क्यांच्या खाली होते; पण त्यानंतरच्या सर्व निवडणुकात त्याची पातळी ६४ टक्क्यांच्या पुढे होती. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत ते ६४·५० टक्के म्हणजे १९७२ पेक्षा एक टक्क्याने जास्त होते. पहिल्या निवडणुकीत वाशीम (५६ टक्के) वगळता बाकी सर्व मतदारसंघांत मतदान पन्नास टक्क्यांपेक्षा कमी होते (मंगरूळपीर ४६, मूर्तिजापूर ३९, अकोला ३५, बाळापूर ४५, अकोट ४०) यानंतरच्या निवडणुकांत गोवर्धन हरिजन मतदारसंघ १९६२– ४०·५२ टक्के, हा अपवाद वगळता एकाही मतदारसंघांत मतदान पन्नास टक्क्यांखाली गेले नाही. १९५१–५२ च्या मानाने १९५७ मध्ये सर्वच मतदारसंघांत वाढ तर झालेलीच आहे; पण वाशीमची सर्वात कमी, सहा टक्के वाढ वगळता इतर मतदारसंघांत ती १६ टक्क्यांपासून ३० टक्क्यांपर्यंत झालेली आहे. अकोट ३० टक्के, अकोला २५ टक्के, मंगरूळपीर २२ टक्के, बाळापूर २२ टक्के, याप्रमाणे ही वाढ झाली. या वाढीचा एक विशेष म्हणजे १९६२ च्या निवडणुकीतही ती बऱ्याच प्रमाणात टिकून राहिली. फक्त मंगळूरपीरमध्ये मतदान आठ टक्क्यानी घटले. इतरत्र मूर्तिजापूर १३ टक्के, अकोला ८ टक्के, बाळापूर २ टक्के, अकोट ७ टक्के अशी वाढच झालेली आहे. वाशीमध्येही मतदान सात टक्क्यांनी वाढले. वाशीमबाबत लक्षणीय विशेष म्हणजे १९६२ च्या निवडणुकीत तेथे ६९·६२ टक्क्यांपर्यंत वाढलेले मतदान १९६७ मध्ये पन्नासच्या पातळीवर आले व १९७२ मध्येही त्याच पातळीवर राहिले. ही घट एकदम का झाली व टिकून का राहिली. याचा अभ्यास व्हावयास हवा बोरगावमंजूमध्ये १९६२ पासूनच्या तीन निवडणुकात ५९·९७, ७१·०४ व ६०·३१ असे मतदान झालेले आहे. १९६७ मध्ये अकरा टक्क्यांची वाढ झाली; पण लागलीच पुढच्या निवडणुकीत ती घटली. मेडशीमध्ये १९६७ च्या निवडणुकीत ७३.३६ टक्के मतदान झाले; पण पुढच्याच निवडणुकीत त्यात चौदा टक्क्यांची घट झाली.

यवतमाळ जिल्ह्याच्या मतदानात १९६२ च्या निवडणुकीत ५४·९५ वरून ७३·६७ पर्यंत म्हणजे १९ टक्के वाढ झाली. पुढच्या निवडणुकीत ती जवळजवळ त्याच पातळीवर राहिली. १९७२ मध्ये मात्र पाच टक्के घट झाली. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत ७० टक्के म्हणजे जवळ जवळ त्याच पातळीवर मतदान झाले. पाच निवडणुकांत पन्नास टक्क्याखाली मतदान (४९ टक्के) फक्त यवतमाळला पहिल्या निवडणुकीत होते. पुसदचा एक विशेष म्हणजे १९६२ पासून लागोपाठ तीन निवडणुकात ८० टक्क्यावर मतदानाची पातळी टिकविलेला महाराष्ट्रातील तो एकमेव मतदारसंघ म्हणावा

लागल ! वसंतराव नाईकांचा हा मतदारसंघ. तेथील मतदान त्यांच्या वैयक्तिक लोकप्रियतेचे निदर्शक होय. पहिल्या तीन निवडणुकांत ते ५६, ६९·२०, ८७·१८ असे वाढत गेले. पुढच्या दोन निवडणुकांत ८१·८० त ८२·६७ अशी त्यात थोडी घट झाली. ८७·१८ हा महाराष्ट्रातील मतदानाचाही उच्चांक म्हणावा लागेल. दारव्हा मतदारसंघात पहिल्या चार निवडणुकात ६७, ६८ ७५·२५, ७७ ७० असे मतदान झाले. १९७२ मध्ये ते दोन टक्क्यांनी घटले. यवतमाळमध्येही असाच क्रम दिसतो. तेथील मतदान ४९, ६३·८०, ७१·५८, ७५·१३ असे वाढत गेले; पण १९७२ मध्ये ६९ ९८ पर्यंत घटले. वणीमध्येही मतदानाचा उच्चांक ( ७०·६४ ) १९६७ च्या निवडणुकीत गाठला गेला. १९७२ मध्ये ते तीन टक्क्यांनी घटले. डिग्रज आणि उमरखेड मतदारसंघात सर्वात जास्त मतदान १९६२ साली झाले. नंतरच्या दोन निवडणुकांत थोडी घट झाली; तरी ते सत्तरच्या पातळीवर टिकले. ( डिग्रज ७८·८०, ७५·३०, ७२·८३, उमरखेड ७५·३५, ७१·७१, ७१·७० ). केळापूरमध्ये १९६२ पासूनच्या तीन निवडणुकात मतदान ७५ टक्क्यांच्या पातळीवर होते. ( ७५·६५, ७८·९२, ७७·३२ )

महाराष्ट्राच्या तिन्ही विभागांत मतदानहक्क जागरूकतेच्या दृष्टीने मराठवाडा सर्वांत मागे आहे, याचा उल्लेख सुरुवातीस आलेलाच आहे. जिल्हा पातळीवरील आणि मतदारसंघ-पातळीवरील मतदानाच्या विश्लेषणात हे विशेषच जाणवते. जिल्हा मतदानाची सरासरी पाहिली तर सर्वांत जास्त मतदान ६५·७२ टक्के उस्मानाबाद जिल्ह्याचे १९६७ च्या निवडणुकीतले आहे. पहिल्या निवडणुकीत सर्व जिल्ह्यात मतदान पन्नास टक्क्यांपेक्षा कमी होते. १९५७ मध्ये यापैकी उस्मानाबाद ५० च्या पातळीवर गेला. १९६२ मध्ये उस्मानाबादच्या जोडीला नांदेडने ५० टक्क्यांची पातळी ओलांडली. १९६७ मध्ये परभणी वगळता बाकी सर्व जिल्ह्यात मतदान पन्नास टक्क्यांवर होते; पण १९७२ मध्ये परभणीच्या जोडीला औरंगाबाद जिल्ह्यात ते पन्नास टक्क्याच्या खाली गेले. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत प्रथमच मराठवाड्याच्या सर्व जिल्ह्यात मतदान पन्नास टक्क्यांवर झाले.

उस्मानाबाद जिल्ह्यात पहिल्या चार निवडणुकात मतदान ४७·३३, ५१·३४, ५८·६६, ६५·७२ याप्रमाणे वाढत गेले; पण १९७२ मध्ये ते ५३·४० टक्क्यापर्यंत घटले. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत ते ५४·५० टक्के होते. या जिल्ह्यात उस्मानाबाद ( ४८ ), पराडा ( ३९ ), उद्‌गीर ( ४२ ), लातूर ( ४६ ) या चार मतदारसघात पन्नास टक्क्यांपेक्षा कमी मतदान होते. औसा, कळंब, अहमदपूरमध्ये ते पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त होते. उस्मानाबादमध्ये पुढच्या सर्व निवणुकात ते केवळ ५० टक्क्यापेक्षा नव्हे तर ५७ टक्क्यापेक्षा जास्त होते. या मतदारसंघात सर्वांत जास्त मतदान ६९·२५ टक्के, १९६७ मध्ये झाले. पराडामध्येही १९२२ पासूनच्या तीन निवडणुकात ते ५४·२४, ५९·८६, ६१·९७ असे वाढत गेले. कळंबच्या बाबतीत लक्षात घ्यावयाचा एक विशेष म्हणजे, तेथे सर्वांत जास्त, ६५·१७ टक्के मतदान पहिल्याच निवडणुकीत झाले. १९५७ च्या निवडणुकीत ते ४३ टक्क्यांपर्यंत घटले. १९६२ मध्ये ५३·३९ टक्क्यापर्यंत वाढले; पण १९६७ मध्ये पुन्हा ४९·९९ टक्क्यांपर्यंत घटले. १९७२ च्या निवडणुकीत त्यात दहा टक्क्याची वाढ होऊन ते ५९·८७ पर्यंत गेले. थोड्या कमी प्रमाणात पण अहमदपूरमध्येही मतदानात असाच चढ-उतार होत गेलेला आहे. ( ५२, ४२·१०, ५५ ४५, ४४·०८, ५७ ४५ ) उदगीर मतदारसंघ मतदानाच्या बाबतीत सर्वांत मागे आहे, तेथे एकाही निवडणुकीत मतदान पन्नास टक्क्याची पातळी गाठू शकले नाही. १९६२ मधील ४८ ८५ हेच सर्वात जास्त मतदान. नतरच्या दोन निवडणुकात ते ४६·११, ४५ ४७ असे घटले. निलगा मतदारसंघात १९५७ मध्ये ५२ ३० टक्के मतदान होते, ते १९७२ मध्ये ७४·०४ टक्क्यापर्यंत वाढले; म्हणजे २२ टक्के वाढ झाली. १९६७ मध्ये ते जवळ जवळ त्याच पातळीवर टिकले; पण १९७२ मध्ये ६८·८३ पर्यंत घटले. वाढीच्या मानाने घट थोडी आहे. लातूर मतदारसंघात १९५७ पासूनच्या तीन निवडणुकात ४८·७०, ६२·२९ ७२·१० याप्रमाणे मतदान वाढत गेले; पण १९७२ मध्ये ते ६२·५ पर्यंत घटले उमरगा मतदारसंघात पहिल्या निवडणुकीत ५९ टक्के मतदान होते, ते १९५७ मध्ये ५२·८७ पर्यंत घटले. पुढच्या दोन निवडणुकांत ६२ ४१, ६९ १५ असे वाढत गेले. १९७२ मध्ये त्यात ६०·९३ पर्यंत घट होऊन ते १९६२ च्या पातळीच्याही खाली गेले. तुळजापूर मतदारसंघातील मतदानाचा चढ-उताराचा क्रम लक्षणीय आहे. १९५७ पासूनच्या चार निवडणुकात तेथे ६०·६०, ४८·८४, ६३ ४१, ५० ६८ असे मतदान होते. चढ-उतार होत तेथे १९५७ च्या तुलनेने टक्के घटच झालेली आहे.

मराठवाड्यात बीड जिल्हा मतदानाच्या बाबतीत सर्वांत मागे आहे. पहिल्या तीन निवडणुकांत तेथील मतदान पन्नास टक्क्यांपेक्षा कमी होते. ( ३६.२८, ३२.८६, ४२.३१ ) पुढच्या दोन निवडणुकांत ते ५२ ७३, ५३ ०३ असे वाढले; पण १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत ५१ पर्यंत घटले. या जिल्ह्याच्या एकाही मतदारसघात पहिल्या तीन निवडणुकांत मतदान पन्नास टक्क्यांवर गेले नाही. यावरून त्याच्या मागासलेपणाची कल्पना येईल. १९५७ च्या निवडणुकीत १९५१-५२ पेक्षा सर्वच मतदारसघांत मतदानात घट झाली. माजळे गावामध्ये ११ टक्के, गेवराईमध्ये १० टक्के, केज ६ टक्के आणि अष्टी व चौसाळामध्ये दोन टक्के असे हे घटीचे प्रमाण होते. केजमध्ये ही घट १९६२ मध्येही चालू राहिली व तेथील मतदान ३१.७१ टक्क्यांपर्यंत खाली गेले. बाकी मतदारसंघात मात्र ते वाढले तरी पन्नास टक्क्यांच्या आतच होते. १९६७ मध्ये मात्र माजळेगाव ( ४२.४९ ) वगळता बाकी सर्व मतदारसघात मतदानाने पन्नास टक्क्यांची पातळी ओलांडली. १९७२ च्या निवडणुकीत केजमधील मतदान ५४.९५ वरून ६३.३६ पर्यंत वाढले. बीड जिल्ह्यातील हे सर्वांत जास्त मतदान केज व रेणापूर वगळता बाकीच्या मतदारसंघात मात्र मतदानात घट झाली. रेणापूरमध्ये १९५७ पासूनच्या चार निवडणुकांत ते सतत वाढत गेले. ( ४०, ४९.३०, ५२.५४, ५९.१४ ).

औरंगाबाद जिल्ह्याचे मतदान पाच निवडणुकांत ३७, ३४.४५, ४८.०८, ५२.०९, ४९.८६ असे होते. म्हणजे पाचपैकी चार निवडणुकांत ते पन्नास टक्क्यांपेक्षा कमी होते. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीतील ५३.५० टक्के मतदान हे जिल्ह्याच्या आतापर्यंतच्या मतदानातील सर्वांत जास्त मतदान होते. पहिल्या दोन निवडणुकांत

जिल्ह्याच्या सर्वच मतदारसंघांत मतदान पन्नास टक्क्यांच्या खाली होते. एवढेच नव्हे तर औरंगाबाद व सिल्लोड मतदारसंघ वगळता १९५१–५२ पेक्षा १९५७ च्या निवडणुकीतील मतदान कमी होते. १९६२ मध्ये भोकरस (५८·८१) औरंगाबाद (५६), गंगापूर (५३.२६), कन्नड (६३) आणि सिल्लोड (५०·४७) या पाच मतदारसंघात पन्नास टक्क्यांची पातळी प्रथमच ओलाडली गेली. भोकरसमध्ये १९६७ मध्ये मतदान सात टक्क्यांनी घटले; पण पन्नास टक्क्याच्या पातळीखाली गेले नाही. १९७२ च्या निवडणुकीत मात्र आणखी चार टक्के घट होऊन ते पन्नास टक्क्यांखाली गेले. औरंगाबादमध्ये ते १९६७ च्या निवडणुकीत ६१.२९ टक्क्यापर्यंत वाढले; पण १९७२ मध्ये ५८·५६ टक्क्यापर्यंत घटले. गंगापूरचे मतदान १९६७ मध्ये ५४·४८ टक्क्यांपर्यंत वाढले; पण १९७२ मध्ये ४९·०७ टक्क्यांपर्यंत घटले. म्हणजे पुन्हा पन्नास टक्क्याखाली गेले. कन्नडमध्ये ही प्रगती टिकून न राहता १९६७ मधे मतदान ४४·२२ टक्क्यांपर्यंत खाली आले. १९७२ मधे मात्र ते पुन्हा ५०.२५ टक्क्यापर्यंत वाढले. सिल्लोडमध्ये १९६२ प्रमाणे १९६७ मधे मतदान पन्नास टक्क्याच्या पातळीवर राहिले; पण १९७२ मधे ४१·५४ टक्क्यांपर्यंत घटून पुन्हा पन्नास टक्क्यांचे खाली गेले. अंबड-मधे पहिल्या चारही निवडणुकात मतदान पन्नास टक्क्याच्या खालीच होते. (३१, ३१·२०, ३७.२७, ४७.७८) फक्त मधे ते ५७ टक्क्या-पर्यंत वाढून पन्नास टक्क्याच्या पातळीवर गेले. जालना मतदारसघात एकाही निवडणुकीत मतदान पन्नास टक्क्यांची पातळी ओलाडू शकले नाही. वैजापूरमधे १९६७ च्या निवडणुकीत मतदान सोळा टक्क्यांनी वाढून ६४·०५ टक्क्यापर्यंत गेले; पण १९७२ मध्ये ४५·८८ टक्क्यापर्यंत घटले

परभणी जिल्ह्याचे मतदान सर्वच निवडणुकांत पन्नास टक्क्याच्या खाली होते. (३३·३३, ३१·८६, ४२·३७, ४९·१८, ४४·५७) पण १९७७ च्या लोकसभा निवडणुकांत मात्र ते ५४ टक्क्यांपर्यंत वाढले. पहिल्या दोन निवडणुकात सर्वच मतदारसंघांत मतदान पन्नास टक्क्यापेक्षा कमी होते. १९६२ मध्ये फक्त हिंगोलीत पन्नास टक्क्यांची पातळी ओलांडली गेली. १९६७ च्या निवडणुकीत मात्र हिंगोलीच्या जोडीला परभणी, कळमनुरी, जिंतूर व पाथरी या मतदारसंघात मतदान पन्नास टक्क्यांच्या वर गेले. त्यापैकी फक्त परभणीमध्ये १९७२ मध्येही ते त्या पातळीवर टिकून राहिले बाकी मतदारसघात मतदानात घट होऊन ते पुन्हा पन्नास टक्क्यांच्या खाली गेले; परतुर मतदारसघाने मात्र प्रथमच या वेळी पन्नास टक्क्यांची पातळी जेमतेम ओलांडली.

नांदेड जिल्ह्याचे मतदान पाच निवडणुकांत ३०·९०, ३९·१६, ५२·५३, ५३·६७ आणि ५९·८० याप्रमाणे वाढत गेले. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीतही ते ५९ टक्के म्हणजे जवळ जवळ १९७२ च्या पातळीलाच होते. पहिल्या निवडणुकीत सर्वच मतदारसघांत मतदान पन्नास टक्क्यांच्या आत होते. १९५७ च्या निवडणुकीत फक्त किनवटमध्ये पन्नास टक्क्याची पातळी ओलाडली गेली. बिलोलीमध्ये मतदान पाच टक्क्यानी घटले. इतर मतदारसंघांत ते वाढले तरी पन्नास टक्क्याच्या आतच होते. १९६२ मध्ये किनवटच्या जोडीला भोकर, हदगाव, नांदेड या मतदारसंघात मतदान पन्नास टक्क्यांवर गेले. किनवटचे एक वैशिष्ट्य म्हणजे पाचही निवडणुकात तेथील मतदानाची चढती कमान होती. (४४·५२, ६४·१३, ६९·१, ७०·३९) यापैकी ७०·३९ हा या जिल्ह्यातील मतदानाचा उच्चांक होय. कंधारमध्येही सर्व निवडणुकांत मतदान वाढत गेले व १९७२ च्या निवडणुकीत पन्नास टक्क्याची पातळी ओलाडली गेली. (२४, ३४, ४६·३८, ४८·४४, ५३·४८)

मतदानहक्क जागरूकतेबद्दलच्या या विभागवार विश्लेषणातून निघणारे मुख्य निष्कर्ष–

१. तिन्ही विभागात विदर्भ नेहमी आघाडीवर व मराठवाडा मागे आहे.

२. मुंबईतील मतदानवाढीचे प्रमाणही विदर्भाच्या तुलनेने कमी आहे.

३. मराठवाड्यातील मतदान पाचही निवडणुकांत वाढत गेले तरी वाढीचा वेग इतर विभागाच्या तुलनेने मंद आहे.

४. पश्चिम महाराष्ट्रात कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यांत म्हणजे दक्षिण महाराष्ट्रात उत्तर व मध्य महाराष्ट्रापेक्षा मतदान-प्रमाण जास्त आहे. □


महाराष्ट्राचा बुलंद आवाज

"दैनिक तरुण भारत"

* ताज्या बातम्या.
* निवडणूक काळातील प्रमुख घटनांची सचित्र माहिती.
* परखड संपादकीय.
* राजकारण, अर्थकारण, समाजकारण यांवरील चौफेर लिखाण.

"दैनिक तरुण भारत"

हा तुमचा आमचा, जनसामान्यांचा आवाज आहे

आचार–विचार–समाचार यांचा समन्वय

"दैनिक तरुण भारत", पुणे–२.

# निवडक 'जनता' उमेदवारांचा परिचय

पृष्ठ १२ वरून



## डॉ. सिंधू चौधरी

**यावल**


गेली पंचवीस वर्षं यावल तालुक्यात जनसेवेमध्येच आपली शक्ती खर्च करणाऱ्या डॉ. सिंधू चौधरी ह्या मतदारसंघातून विधानसभेची निवडणूक लढवीत आहेत.
१९५२ साली डॉ. सिंधू चौधरी यांनी धान्य-भाव सत्याग्रहात एक महिन्याची शिक्षा भोगली. १९५६ साली झालेल्या गाव्याच्या स्वातंत्र्यसंग्रमातही त्यानी भाग घेतला होता. आरोग्य मंडळ, फैजपूर या संस्थेच्या डॉक्टरीणबाई संस्थापिका असून त्याद्वारे शिशुविहार केंद्र, साने गुरुजी चॅरिटेबल हॉस्पिटल, कुटुंब नियोजन केंद्र वगैरे लोकोपयोगी संस्था चालविण्यात येतात. महाराष्ट्रात खा. मृणालताई गोरे यांनी सुरू केलेल्या महागाईविरोधी आंदोलनातही डॉक्टरीणबाईंनी भाग घेतला आहे. त्या वेळी केलेल्या निदर्शनात आणि १९७३ साली फैजपूरला जो गोळीबार झाला त्या संदर्भात डॉक्टरीणबाईंना अटकही झाली होती. हा खटला तीन वर्षं चालला आणि शेवटी डॉक्टरीणबाईंची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. खानदेशात हुंडाविरोधी चळवळ सर्वप्रथम उभारून जनजागृतीचा मोठा प्रयत्न सिंधूताईंनी केला.
हे सर्व करीत असताना कुठल्याही लाभाची अपेक्षा सिंधूताईंनी केली नाही. केवळ जनहित एवढे एकच उद्दिष्ट त्यांनी आपल्या डोळ्यांसमोर ठेवले आणि त्याच हेतूने ही निवडणूक सिंधूताई लढवीत आहेत. *



## बाबुराव भारस्कर

**कर्जत (नगर जिल्हा)**

श्री. बाबुराव भारस्कर हे १९५२, १९६२, १९६७ आणि १९७२ या विधानसभेच्या चार निवडणुकांमध्ये एकाच मतदारसंघातून निवडून आले. प्रथम ते काँग्रेस पक्षात होते; पण खालच्या वर्गातील कार्यकर्त्यांना (विशेषतः दलितांना) काँग्रेसमधील वरिष्ठ मंडळी हीन लेखतात, असा कटु अनुभव बाबुरावांना आला. त्यामुळे त्यांनी ना. जगजीवनराम यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीला जाऊन जनता पक्षात प्रवेश केला. तत्पूर्वी १९६७ ते १९७२ या काळात काँग्रेसच्या मंत्रिमंडळात असताना बाबुरावांनी दलिताच्या समस्यांवर व त्यांची उकल करण्यावर आपलं लक्ष केंद्रित केलं.
श्री. बाबुराव भारस्कर सध्या जनता दलित समितीचे प्रमुख, पार्लमेंटरी बोर्ड व महाराष्ट्र कार्यकारिणीचे सन्माननीय सदस्य आहेत. *



## रामदास नायक

**खेरवाडी**

रामदास नायक खेरवाडी मतदारसंघातून महाराष्ट्र राज्याची विधानसभा निवडणूक जनता पक्षाच्या वतीने लढवत आहेत. श्री. नायक हे मुंबईतील सर्वात तरुण उमेदवार आहेत.

१९६१ सालापासून श्री. नायक कामगार संघटनांमध्ये काम करत आहेत. १९६७ साली त्यांनी राजकीय क्षेत्रात प्रवेश केला आणि आपल्या प्रामाणिक व निरलस कार्यामुळे ते भराभर वर चढत गेले. १९७२ मध्ये श्री. नायक यांनी वांद्रे (पूर्व) येथील सरकारी वसाहतीतील रहिवाशांचे प्रश्न सरकारपर्यंत पोचवले. परिणामी शासनाने इमारत-दुरुस्ती,

सांडपाण्याची व्यवस्था, वायरिंग, रंगकाम इत्यादी कामं ताबडतोब सुरू केली. १९७५ च्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या संपात श्री. नायक यांनी चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांसाठी पन्नास पोती गहू जमवून त्याचं वाटप केलं. अशा प्रकारच्या प्रत्येक संपात ते संप–कार्यकर्त्यांना हरतऱ्हेचं साहाय्य करत असतात व त्यामुळे संपकऱ्यांचं मनोधैर्य टिकवण्यास हातभार लावत असतात.
आणीबाणी जाहीर झाल्याबरोबर श्री. रामदास नायक यांनी पश्चिम उपनगरातून कार्यकर्त्यांच्या अनेक गुप्त बैठकी भरवल्या आणि वडील अत्यवस्थ असतानाच ९ नोव्हेंबर १९७५ रोजी सुरू व्हायच्या सत्याग्रहसत्राचे संघटन करण्यासाठी ते भूमिगत झाले. पुढे श्री. नायक यांना अटक झाली आणि ते तुरुंगात असतानाच त्यांच्या पिताजींचं दुःखद निधन झालं.
अशा तऱ्हेने कौटुंबिक समस्यांपेक्षा देशापुढील समस्यांना अधिक प्राधान्य देणाऱ्या श्री. रामदास नायक यांची जनमानसातील प्रतिमा अधिकच उंचावली आहे आणि येत्या निवडणुकीतील ती त्यांची सर्वांत मोठी जमेची बाजू आहे. ❊



## मूलचंदभाई मोदी

**पेण**

या विधानसभेच्या निवडणुकीसाठी पेण मतदारसंघातून जनता पक्षाने श्री. मूलचंदभाई मोदी यांना अधिकृत उमेदवार म्हणून निवडले आहे.
पिढीजात व्यापारी कुटुंबात जन्म घेऊनही सेवाभावी कार्यकर्ता या नात्याने मूलचंदभाईंनी स्वतचं असं खास स्थान निर्माण केलं आहे. त्यांनी नागोठणे इथे सेवादलाची शाखा चालवली होती, तसंच सेवादलाची शिबिरे, श्रमदान शिबिरं, सानेगुरुजी सार्वजनिक वाचनालय यातही त्यांचा पुढाकार असतो. नागोठणे गाव व त्या भोवतालचा परिसर सतत प्रगतिशील राहावा या दृष्टीने मूलचंदभाई प्रयत्नशील असून सहकारी तत्त्वावर उभी राहणारी प्रत्येक लोकाश्रयी चळवळ त्यांनी शेतकऱ्यांपर्यंत यशस्वीपणे पोचवली आहे. नागोठणे ग्रामपंचायतीचे सदस्य म्हणून काम करताना त्यांनी अनेक समस्यांना सामोरे जाऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी सतत प्रयत्न केले. याच प्रश्नावर त्यांनी ग्रामपंचायतीच्या सदस्यत्वाचा राजीनामाही दिला.
श्री. मूलचंदभाई कोकण कृषि विद्यापीठाचे सदस्य आहेत. ❊



## मधुकर पाटील

**अलिबाग-उरण**

कुलाबा जिल्हा हा सतत जागृत आणि लढाऊ राहिलेला महाराष्ट्रातील जिल्हा आहे. स्वातंत्र्य व आंदोलन आणि नंतरचे लहान-मोठे लढे यात हा जिल्हा सतत अग्रभागी राहिलेला आहे. या जिल्ह्याचे नेतृत्वही आजवर झुंजार वृत्तीच्या व्यक्तींनीच केले आहे.
या विधानसभेच्या निवडणुकीसाठी प्राध्यापक मधुकर पाटील यांच्या रूपाने नवी रचनात्मक सामाजिक दृष्टी असलेला सौजन्यशील आणि अनुभवसंपन्न नेता जनतेसमोर उभा आहे.
अलिबाग तालुक्यातील प्रायः अशिक्षित शेतकरी कुटुंबात जन्म घेतलेल्या या तरुणाने विविध शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रांत यशस्वी संचार करून आजवर भरपूर अनुभव संपादन केला आहे. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात स्वतः अभिमानास्पद यश मिळवून माध्यमिक, महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय शिक्षणक्षेत्रात यशस्वी व विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून लौकिक कमावला आहे. शिक्षणक्षेत्रात काम करीत असताना गरीब व मागासलेल्या समाजाचे प्रश्न विशेष लक्षात घेऊन त्या समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण सुलभतेने मिळावे व त्यांचा सहज विकास व्हावा म्हणून प्रा. पाटील यांनी तत्परतेने कळकळीने सर्व सहाय्य केले आहे. सुसंस्कार आणि सामाजिक समता यांचा पुरस्कार करणारी निर्मल दृष्टी आपल्या शिक्षणकार्यातून व आचरणातून त्यांनी समाजासमोर सतत मांडली आहे. स्वभावातील सौजन्य, सामाजिक कार्याविषयी नितांत तळमळ आणि विशुद्ध जीवन या गुणांमुळे प्रा. मधुकर पाटील यांनी त्यांच्या सर्व कार्यक्षेत्रात आपल्याबद्दल आदरभाव निर्माण केला आहे. अलिबाग तालुक्याच्या राजकीय जीवनाला वेगळे वळण लावण्यासाठी प्रा. मधुकर पाटील अलिबाग–उरण मतदार संघातर्फे उमेदवार म्हणून निवडणुकीस उभे आहेत. त्यांचीच निवड करून आपल्या तालुक्यातील जनता नवे नेतृत्व निर्माण करील, अशी खात्री आहे. □

# युवकांनो, हीच वेळ आहे !

निवडणुकीचे वातावरण आता चांगलेच तापू लागले आहे. भिंती रंगल्या आहेत आणि रस्ते झेंडेपताकांनी सजू लागले आहेत. अशा वेळी एरवी निष्क्रिय असणाऱ्या विद्यार्थी युवकांना देखील स्फुरण चढते. मधमाशांच्या पोळ्यातून मधमाशा जशा बाहेर पडतात तसे नवीन तरुण विद्यार्थी कार्यकर्ते निरनिराळ्या पक्षाच्या प्रचाराला बाहेर पडतात. घोषणांचे युद्ध आणि प्रचारसभांतून दुसऱ्या पक्षाच्या लोकांवर टीकास्त्र सोडण्यातच युवकांची कार्यशक्ती वाया जाते; पण खरोखरच किती कार्यकर्ते एखाद्या पक्षाच्या धोरणाचा किंवा जाहीरनाम्याचा अभ्यास करून त्या पक्षाच्या प्रचाराला बाहेर पडतात? बहुसंख्य युवक ज्या पक्षाचा जोर अधिक, त्याच्या बाजूनेच घोषणा देत फिरतात किंवा पैसेवाल्या उमेदवारापाशी असे भाडोत्री युवक–कार्यकर्ते देखील मोठ्या प्रमाणावर आढळतात. आपण युवाशक्ती, एक नवीन निर्माण–शक्ती वगैरे गप्पा मारतो; पण निवडणुकीच्या काळात खरोखरच सारासार विचार करून आपण काम करतो का?

खरे म्हणजे या युवकांचे कार्यक्षेत्र पक्षीय किंवा निवडणुकांचे राजकारण एवढेच मर्यादित नाही. सत्तेच्या आणि पक्षीय राजकारणापासून दूर राहून पण तरीही राष्ट्रीय राजनीतीशी संपर्क ठेवून सार्वजनिक जीवनातील मलीनता, नेतृत्वातील भ्रष्टता व प्रशासनातील भ्रष्टाचार यावर सामाजिक अंकुश ठेवणे हे खरे युवाशक्तीचे काम आहे; पण राज्यकर्त्यांनी शासन-कारभार कार्यक्षमपणे, कुशलतेने चालवून लोकांपुढे नेतृत्वाचा आदर्श घालून द्यावा. याकरिता अशा तळमळीच्या, खरे काम करणाऱ्या व शुद्ध चारित्र्याच्या उमेदवाराला राज्यकारभाराची संधी देणे हे देखील युवाशक्तीचेच काम आहे. त्यामुळे या विधानसभा-निवडणुकीत युवकांनी सक्रिय भाग घेणे ही सध्याची तातडीची गरज आहे.

दिवसेंदिवस सुशिक्षित बेकारांची फौज वाढतेच आहे. युवकांना भेडसावणारी भविष्याची चिंता आणि शिक्षणविषयक औदासीन्य याला काँग्रेसची शिक्षणक्षेत्राची चुकीची धोरणेच कारणीभूत आहेत. राजकारणापासून अलिप्त राहणे आवश्यक असलेल्या शिक्षणक्षेत्राचा त्यांनी राजकारणाचा आखाडा केला. बुद्धिवंत, चारित्र्यवान, ज्येष्ठ व सामाजिक मान्यता असलेल्या व्यक्तींना डावलून स्वत:च्या संकुचित स्वार्थाकडेच लक्ष देणारी माणसे त्यांनी शिक्षणक्षेत्रात आणली. पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुपदाकरिता हंसराज पाटलांसारख्या माणसाचे नाव पुढे येते हे याचे सर्वांत बोलके उदाहरण होय. याचप्रमाणे काँग्रेस शासनाने विद्यापीठाच्या जिल्हा परिषदा करून टाकल्या. १२ वी व एफ्. वाय्. च्या दोन्ही बॅचेस एकाच वर्षी इंजिनिअरिंग व मेडिकलकरिता एकत्र आल्या व हाच तर त्या शिक्षणविषयक अदूरदर्शी धोरणाचा कळस होता. ही मुले खरोखर दुर्दैवी असे म्हणून शिक्षणमंत्री श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी आपली जबाबदारी झटकली. १२ वीच्या विद्यार्थ्यांचे एक वर्ष हकनाक वाया गेले. या वर्षीपासून बदल म्हणून सेमिस्टर पद्धत सुरू केली; बदल म्हणजे पूर्वी एकच वार्षिक परीक्षा असे, सध्या दोन वार्षिक परीक्षा केल्या आहेत. अंधानुकरण करताना त्याचे आर्थिक व व्यवहार्य परिणाम विचारातच घेतले नाहीत.


शिक्षणावर होणारा खर्च ही दीर्घ स्वरूपाची गुंतवणूक आहे, याचा शासनाला विसर पडला आहे. शक्य तेवढी कमीत कमी रक्कम शिक्षणावर खर्च करायची हाच उदासीन हेतू आजतागायत पुढे रेटला जात आहे. दरवर्षी शिक्षणक्षेत्रावर खर्च होणाऱ्या रकमेच्या टक्केवारीत घट होते.

काँग्रेसच्या या पार्श्वभूमीवर जनता पक्षाचा केंद्रातील उदय हा युवकांना चैतन्यमय प्रकाशदायी ठरलेला आहे. महाराष्ट्रात जनता पक्षाने जाहीरनाम्यात शेतीव्यवसायाला प्राधान्य देऊन नव्या धोरणांची पुनर्रचना करण्यात येईल असे सांगितले आहे. सहकार चळवळ भ्रष्टाचारापासून मुक्त करून अधिकाधिक लोकाभिमुख बनविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. सहकारी संस्थांच्या संचालक मंडळावर १५ टक्के जागा दलितांसाठी राखून ठेवण्यात येणार आहेत. ग्रामीण उद्योगधंद्यांना भांडवल व सोयी उपलब्ध करून दिल्या जातील. बेकारी-निवारणास घरटी एकाला नोकरी देण्याची व्यवस्था तातडीने केली जाऊन त्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होईल अशा योजना आखल्या जाणार आहेत. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण सर्वांना मोफत देण्याची हमी देखील जनता पक्षाने घेतली आहे. बिहारमध्ये कर्पूरी ठाकूर यांच्या जनता सरकारने ११ वीपर्यंतचे शिक्षण मोफत केले आहे. अनुदान पद्धतीत सुधारणा, सैनिकी शाळात वाढ यांसारख्या मूलभूत आवश्यकतांची दखल घेतली जाणार आहे. प्रशासनातील भ्रष्टाचार, लालफितीचा कारभार टाळण्यासाठी कडक उपाययोजना केली जाईल.

३८ ते ४२ व्या घटनादुरुस्त्या रद्द करण्याचे आश्वासन जनता पक्षाने लोकसभेच्या निवडणुकीत दिले होते; पण जोपर्यंत राज्यामध्ये व राज्यसभेत जनता पार्टीला बहुमत मिळत नाही, तोपर्यंत या दुरुस्त्या रद्द करण्यात वैधानिक अडचणी येणार आहेत आजही केंद्र सरकारला आणीबाणी लादून मिसा वापरला तरी कोर्टात जाता येणार नाही, असे अधिकार आहेत. या मानवी मूल्यांची पायमल्ली करणाऱ्या घटनादुरुस्त्या रद्द झाल्याच पाहिजेत. अंतर्गत सुरक्षा कायदा रद्द करावा. रोजगार आणि शिक्षण हे नागरिकाचे मूलभूत अधिकार समजण्यात यावेत. १८ वर्षांवरील व्यक्तीस मतदानाचा हक्क असावा अशी जनता पक्षाची आग्रहाची मागणी आहे.

जनता पक्षाने आश्वासने पुरी केली नाहीत किंवा काँग्रेससारखाच भोंगळ कारभार केला आणि आपल्या प्रश्नांना स्वत:च्या स्वार्थासाठी बगल दिली तर जनता सरकारला जाब विचारण्याकरिता आपण युवक खंबीर आहोतच; पण सध्या तरी जनता पक्षाला एक वेळ महाराष्ट्रात ही संधी दिलीच पाहिजे.

–जयंत म्हाळगी



## कुठे आहे चंद्रशेखर ?

## कुठे आहे जनता हवा ?

## कुठे आहे पन्नालाल ?

चंद्रशेखरांवरील भ्याड हल्लाच
शंकरराव मोहिते पाटलांना
आता चारीमुंड्या चीत करणार आहे !

## अकलूज वार्तापत्र

पृष्ठ . . . . ४